पुणें मर... ...ठी ग्रंथसं...
निबंध
क्रमांक— ९७५५

(80)
015688

...फेडरेशनची लघु पुस्तकमाला नं० १.

# ...ऑसफी

## ( ब्रह्मविद्या )

आणि

# थिऑसफिकल सोसायटी

यासंबंधानें

संक्षिप्त माहिती, त्यांवर निघणाऱ्या सामान्य शंका व त्यांचा खुलासा.

लेखक

नारायण गणेश परांजपे, बी. एस्. सी.

प्रकाशक:

मराठी थिऑसफिकल फेडरेशन.

पुणें येथें " आर्यभूषण " छापखान्यांत छापिलें.

१९१२.

हें पुस्तक

पुणें येथें ' **आर्यभूषण** ' छापखान्यांत रा० **नटेश अप्पाजी द्राविड**
यांनीं छापिलें व **नारायण गणेश परांजपे, बी. एस्‌. सी.,**
**सेक्रेटरी मराठी थिऑसफिकल फेडरेशन,**
यांनीं **मुधोळ**, येथें प्रसिद्ध केलें.

# थिऑसफी

## आणि

# थिऑसफिकल सोसायटी.

आपल्या इकडे, अशिक्षित लोकांमध्येंच नव्हे तर कांहीं शिक्षित लोकांतही, 'थिऑसफी आणि थिऑसफिकल सोसायटी' यांसंबंधानें विपरीत ग्रह दृष्टीस पडतात. त्यांसंबंधानें थोडक्यांत विवेचन करण्याचें व त्यांवर येणाऱ्या सामान्य आक्षेपांचें विवरण करण्याचें या छोट्याशा पुस्तकांत योजिलें आहे.

'थिऑसफी' हा इंग्रजी शब्द ग्रीक भाषेंतून आला आहे. थिऑस् = ईश्वर व सोफाया = ज्ञान, या दोन शब्दांचा तो बनलेला आहे. अर्थात् थिऑसफी ह्या दोन शब्दांचा अर्थ "ईश्वरज्ञान" "ईश्वरविद्या" "आत्मविद्या" "ब्रह्मविद्या" असा होतो. या ब्रह्मविद्येची उत्पत्ति थिऑसफिकल सोसायटीच्या स्थापनेपासून झालेली नाहीं. ती वस्तुतः अनादि आहे. थिऑसफी हा शब्द, युरोपांत पूर्वीं, ब्रह्मविद्या ह्या अर्थानें प्रचलित होता व म्हणूनच तो पारिभाषिक शब्द हल्लीं तिकडे त्याच अर्थानें उपयोगांत आला आहे. ब्रह्मविद्येची उत्पत्ति जशी थिऑसफिकल सोसायटींत नाहीं, त्याप्रमाणेंच ब्रह्मविद्येचा विस्तारही थिऑसफिकल सोसायटीच्या वाङ्मयानें मर्यादित नाहीं. ब्रह्मविद्या ही वस्तुतः कोणत्याही ग्रंथावर अथवा

भाषेवर अवलंबून नाहीं व त्या विद्येला कशाचीही मर्यादा घालतां येत नाहीं. ज्ञानेश्वर—तुकाराम—रामदासादिकांनीं सांगितली ती ब्रह्मविद्या; श्रीमत् शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य इत्यादिकांनीं निरूपिली ती ब्रह्मविद्याच; व्यास, गौतमबुद्ध, येशूख्रिस्त, महंमदपैगंबर, कॉन्फ्यूशियस[1], झोरोॲस्टर[2], हरमिस[3], ऑरफिअस[4] यांनीं जगाच्या अनेक भागांवर येऊन जी शिकविली तीही ब्रह्मविद्याच; असें असून या सर्वांनीं शिकविलेलें ज्ञान एकत्र केलें तरी त्या ज्ञानसमूहाला संपूर्ण ब्रह्मविद्या अथवा थिऑसफी म्हणतां येणार नाहीं. जसें, ब्रह्म तशीच ब्रह्मविद्या अनादि व अनंत आहे. तेव्हां अमक्या ग्रंथांत व अमक्या भाषेंत ब्रह्मविद्या आहे, किंवा असूं शकेल असें मानणें म्हणजे ब्रह्मविद्येस आकुंचित करण्यासारखें आहे. व याच कारणानें थिऑसफिकल सोसायटीच्या वाङ्मयानें थिऑसफी अगर ब्रह्मविद्या पुरी होत नाहीं.

---

१. हे सत्पुरुष चीन देशांत इ. स. पूर्वी ५५० या वर्षीं एका थोर कुलांत जन्मास आले. लोकांच्या कल्याणाकरितांच संताची ही विभूति अवतरली होती. यांचा शिष्यवृंद २००० वर होता. यांची अवतारसमाप्ति इ. स. पूर्वी ४७८ या वर्षीं झाली.

२. हे पर्शिअन धर्माचे संस्थापक होत.

३. प्राचीनकाळीं इजिप्तमध्यें प्रसिद्धीस आले. तेथील " थॉय ( thoy ) " लाच हें नांव देत असतां. यांनीं धार्मिक, नैतिक वगैरे विषयांवर एकंदर ४२ पुस्तकें लिहिलीं आहेत.

४. ग्रीसमध्यें तेथील धर्माचे उत्पादक म्हणून प्रसिद्धीस आले. यांच्या पंथाचा उल्लेख इ. स. पूर्वी ६०० या वर्षीं केलेला आढळतो. मांस खाणें आणि दारूसारखें मादक पेय पिणें हें हे निंद्य समजत असत व त्याप्रमाणें त्यांनीं आपली वागणूक ठेविली होती.

जगाचे पाठीवर अनेक स्थलीं व अनेक कालीं या ब्रह्मविद्येचें निरूपण करण्याकरितां प्रयत्न होत असतात. मानव जातीच्या आध्यात्मिक उन्नती करितां जे असे अनेक प्रयत्न होतात, त्यांपैकींच कांहीं धर्मपंथ बनत असतात; इतिहासांत उपलब्ध नाहींत असे अनेक प्रयत्न होऊन गेले असतील व कांहींची तर इतिहास साक्ष देतच आहे. असे प्रयत्न पुढेंही व्हावयाचेच. अशा प्रयत्नांपैकींच थिऑसफिकल सोसायटी हा एक प्रयत्न आहे. मानवजातीस या प्रयत्नाचा उपयोग असेल तर तो टिकेल; नसेल तर ती सोसायटी नष्ट होईल. म्हणून त्यापासून थिऑसफीस अथवा ब्रह्मविद्येस कांहीं कमीपणा येऊं शकत नाहीं. हिंदूधर्मांत उत्पन्न जाहलेल्या गौतम बुद्धांनीं ब्रह्मविद्येचें पुनरुज्जीवन करण्याचा उत्कृष्ट प्रयत्न केला; परंतु त्याचा परिणाम मानव जातीमध्यें आणखी एक धर्मपंथ स्थापण्यांत जाहला. थिऑसफिकल सोसायटीच्या विद्यमानें होणाऱ्या प्रयत्नाचा तसा परिणाम होऊं नये अशी या सोसायटीच्या संस्थापकांची व प्रस्तुतच्या चालकांची इच्छा आहे. अर्थात् ही सोसायटी कोणत्याही एका विशिष्ट धर्माचा अगर सांप्रदायाचा पंथ नव्हे, तर थिऑसफिकल सोसायटी ही एक स्वतंत्र संस्था असून तिच्यामार्फत ब्रह्मविद्येच्या प्रसाराचा प्रयत्न चालू आहे.

याच सोसायटीचे मार्फत असा प्रयत्न होण्याचें प्रयोजन प्रस्तुतकालीं काय होतें व त्यास कारणें काय झालीं अशी साहजिक शंका उत्पन्न होते. तिचें निरसन करण्याचा आपण थोडासा प्रयत्न करूं.

सुमारें अर्ध शतकापूर्वींची पृथ्वीवरील मानवजातीची परिस्थिति पाहूं जातां असें दिसून येईल कीं, त्या कालीं जिकडे तिकडे भौतिक शास्त्रें ( Physical Sciences ) वृद्धिंगत करण्याचा जारीनें प्रयत्न सुरू होता. युरोपियन लोक सर्व पृथ्वीवर पसरत होते आणि आपल्या बुद्धिबलानें व बाहुबलानेंच नव्हे तर आपल्या विचारपद्धतीनें सर्व जग ते आक्रमित चालले होते. तो क्रम अद्यापही सुरू आहेच. त्या विचारपद्धतीचें बीज व

प्रसार भौतिक शास्त्राभ्यासावर अवलंबून आहे. प्रत्येक गोष्टीचें कार्यकारण समजावें, त्या कार्याचें कारण हुडकण्याचा प्रयत्न करावा ही त्या शास्त्राभ्यासाची गुरुकिल्ली आहे. जेथें कळत नाहीं तेथें समाधान मानून न घेतां त्या शोधाकरितां धडपडत रहावें अशी मनोवृत्ति बनल्याखेरीज भौतिक शास्त्राची प्रगति होणें शक्यच नाहीं. अर्थात् युरोपियन बुद्धिमान् लोकांची प्रवृत्ति अशा प्रकारें चिकित्सक बनत चालली. या भौतिक शास्त्रज्ञानाचा युरोपांत महंमदी लोकांनीं प्रवेश केला व त्यांनीं स्थापन केलेल्या विद्यापीठांत युरोपीय लोक अभ्यास करूं लागले, ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. त्या समयीं रोम शहरीं ख्रिस्ती धर्माचे मुख्य आचार्य पोप यांचें अत्यंत वर्चस्व होतें. परंतु ते ‘ अधिकारी ’ पुरुष नव्हते. त्यांस धर्मांत किंवा धार्मिक आचारांत ही चिकित्सक बुद्धि आलेली खपण्यासारखी नव्हती; कारण जेथें अज्ञान आहे तेथें चिकित्सक बुद्धि आली कीं फजीती होऊं लागते. आपले वर्चस्वास कमीपणा येऊं नये या मानवी वृत्तीस अनुसरून या भौतिक शास्त्रज्ञानाचे प्रसारास ख्रिस्ती धर्माचार्यांकडून तीव्र विरोध सुरू झाला व जे सत्पुरुष या ज्ञानाचे मार्गास लागले त्यांचा अत्यंत छळ सुरू झाला. असत्य व अज्ञान यांनीं वैभवाच्या व अधिकाराच्या जोरावर ज्ञान व सत्य ( दोन्ही वस्तुतः एकच आहेत ) यांच्या मार्गांतील लोकांशीं संग्राम मांडला. प्रथम कितीही विपरीत परिणाम दिसले तरी अंतीं सत्यमार्गांतील लोकांचा जय व्हावयाचाच. त्याप्रमाणें भौतिक शास्त्रज्ञांनीं मानवी मनोभूमीवर जय मिळविला व त्याचा परिणाम या जड भूमीवरही तशाच प्रकारचा झाला. त्यामुळें पारडें फिरून धर्माचा उपहास सुरू झाला, व क्रियाप्रतिक्रियेच्या नियमानुसार धर्म व धार्मिक गोष्टी यांची थट्टा व किंचित् छळही सुरू झाला. धार्मिक लोकांचा शारीरिक छळ होण्याचे दिवस मात्र आतां उरले नव्हते यामुळें देहदंड त्यांस भोगावे लागले नाहींत, परंतु त्याहून वस्तुतः तीव्र असा उपहास सुरू होऊन धार्मिक गोष्टींचा वि-

चार करणारा मनुष्य सडक्या मेंदूचा अशी ज्ञानसंपन्न लोकांत समजूत पसरत चालली.

प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करण्याची पद्धति सुरू झाली व तीस अनुसरून धर्मग्रंथांच्या चिकित्सक अभ्यासास युरोपीय पंडितांमध्यें सुरुवात झाली. (Comparative Mythology) म्हणजे पुराणग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास करून, त्याचें एक शास्त्र बनविण्याचा तिकडे प्रयत्न झाला. सर्व धर्मग्रंथांमध्यें व पुराणांमध्यें बऱ्याच गोष्टींचें साम्य आहे, एका गोष्टीवरून दुसरी गोष्ट उतरलेली आहे कीं काय असें वाटण्याजोगीं त्या ग्रंथांमध्यें अनेक स्थळें आहेत, असें या पंडितांनीं अत्यंत श्रम घेऊन निर्विवाद सिद्ध केलें. परंतु इतिहासदृष्टीनें पाहतां ज्या राष्ट्रांचा संबंध कधींही आलेला असणें शक्य नाहीं अशा भिन्न राष्ट्रांच्या धर्मग्रंथांतील व कथानकांतील साम्य-विलक्षण साम्य-पाहून ते बुचकळ्यांत पडले. त्याचें कारण त्यांस समजेना. साम्य तर अत्युत्कृष्ट रीतीनें स्थापित केलें व त्या साम्याचे कारणांचा उहापोह सुरू झाला. शेवटीं मनुष्यप्राणी बाल्यावस्थेंत असतांना, नैसर्गिक चमत्कार पाहून जें कौतुक, भीति, आश्चर्य, इत्यादि मनोविकार त्याचे ठायीं उत्पन्न झाले, त्याचे परिणाम सर्वत्र सारख्या प्रकारचेच होणें योग्य आहे व त्याप्रमाणेंच हेंही घडून आलें असलें पाहिजे. हे पुराणग्रंथ अशा प्रकारच्या विकारांनीं उत्पन्न झालेलीं काव्यें होत, असें त्या पंडितांनीं ठरविलें, अर्थात् सर्व पुराणधर्मग्रंथांची " bablings of child humanity " " बालमानवांचे खुळे बोबडे बोल " अशी व्याख्या झाली; याबद्दल कांहीं विद्वान् लोकांस जरी पूर्ण खात्री वाटली नसली, तरी या कारणाखेरीज दुसरें सयुक्तिक कारण पुढें न आल्यामुळें हा सिद्धांत मान्य करण्याकडे विद्वान् मानल्या जाणाऱ्या लोकांमध्यें प्रवृत्ति पडत चालली, व ' बाबावाक्यं प्रमाणं ' याला हंसणारे परंतु त्यास अनुसरूनच सामान्यतः वागणारे ज्ञानलवदुर्विदग्ध लोक हा सिद्धांत डोक्यावर घेऊन नाचूं लागले.

याचा परिणाम सामान्यतः मानवजातीवर कसा होणार याचा विचार करण्यापूर्वी दुसऱ्या एका गोष्टीचा थोडासा उल्लेख करणें जरूर आहे. मनुष्यांमध्यें ज्या गोष्टींचा प्रसार होतो व ज्या समजुती दृढ होतात त्यांचा उगम बहुधा विद्वान् व अधिकारी मनुष्यांच्या विचारांमध्येंच असतो, व ज्या समजुतींचा अशा प्रकारचा उगम नसतो त्या समजुती चिरकाल राहूं शकत नाहींत. परिस्थितीस अनुसरून त्या बदलत जातात; दृढ होऊं शकत नाहींत. धर्म बुडाला, अधर्म वाढत चालला अशी जी जिकडे तिकडे ओरड असते ती हल्लीं मात्र आहे, पूर्वीं नव्हती, असें नाहीं. अधर्माची वाढ व्हावयाची व पुन्हां धर्मसंस्थापनेचा प्रयत्न व्हावयाचा ही गोष्ट दिवसरात्र या कालचक्राप्रमाणें नेहमींचीच आहे. संसारसुखास लोलुप झालेला, धनदारादि मोहास बळी पडलेला जनसमूह ऐहिक सुखांत इतका गढून जातो कीं, सद्यःकालापलीकडे त्याची दृष्टिच जात नाहीं. धार्मिक व पारलौकिक गोष्टींच्या विचारांस त्याच्या मनोभूमीवर प्रवेशच करितां येत नाहीं. ही स्थिति हरहमेश सर्वत्र दिसत असते. परंतु ज्या कारणांनीं ही धर्मग्लानि उत्पन्न होते तीं कारणें म्हणजे ऐहिक सुखें व धनदारादि मोह हे, क्षणभंगुर असल्यामुळें ही अवस्था लवकरच बदलत असते. ही धर्मग्लानि ज्ञानावर अगर ज्ञानाभासावर अवलंबून नसून अत्यंत अशाश्वत गोष्टींवरच अवलंबून असल्यामुळें ती अशाश्वतच असते. अर्थात् अशा वृत्तीपासून भयंकर नुकसान नसतें. आपल्या इकडे अशाच प्रकारची धर्मग्लानीची स्थिति होती व म्हणूनच आपल्या देशांत ब्रह्मविद्येचे उपदेष्टे जे साधुसंत त्यांनीं ही धर्मग्लानि नष्ट करण्याकरितां ऐहिक वैभवाची नश्वरता आपल्या अत्यंत अधिकारयुक्त व कडक वाणीनें जनसमूहापुढें वर्णिली आहे. त्यांच्या ग्रंथांचें कार्यही असेंच वैराग्यरूपानें दृष्टीस पडत आहे. आपले धर्मोपदेशक-हरिदास व पुराणिक-संसाराची क्षणभंगुरताच आपल्या रसाळ

वाणीनें लोकांपुढें मांडण्याचा प्रयत्न करीत असतात. अर्थात् धर्मग्लानीचें कारण जें ऐहिकसुखलोलुपता त्यावर त्यांचे प्रहार सुरू असतात. या धर्मोपदेशानें कित्येकांस वैराग्य प्राप्त होतें; तसेंच कित्येकांस अनुभवानें व दुःखराशींनीं वैराग्याची प्राप्ति होते. हें वैराग्य म्हणजे वस्तुतः ऐहिक सुख-पराङ्मुखता प्राप्त झाली कीं, पारलौकिक व आध्यात्मिक गोष्टींकडे त्यांचें लक्ष जातें.

युरोपांत व युरोपियांचे सहवासानें इतरत्र जी धर्मग्लानि सांप्रत उत्पन्न झाली आहे, ती दिसण्यांत जरी याच प्रकारची दिसते, तरी तिचें कारण मात्र अत्यंत भिन्न आहे. भौतिक शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व त्या ज्ञानाच्या प्राप्तीची पद्धति या गोष्टींत या धर्मग्लानीचें मूळ आहे.: प्रत्येक गोष्टीच्या कार्यकारणाचा शोध करण्याची प्रवृत्ति या शास्त्राभ्यासानें पडते, व ती प्रवृत्ति त्या शास्त्रापुरतीच न राहतां, हरएक गोष्टीची शहानिशा त्या पद्धतीनें केल्याखेरीज मनास समाधान प्राप्त होत नाहीं, असा त्या प्रवृत्तींत गुण आहे. मनुष्याची तर्कवितर्क-बुद्धि जागृत झाली म्हणजे तो त्याच दृष्टीनें सर्वत्र शोध करूं लागतो; व म्हणूनच धर्म, धार्मिक आचार, धर्मग्रंथ इत्यादि गोष्टींचा विचार या चिकित्सक पद्धतीनें युरोपांत सुरू झाला. त्या काळचे धर्माधिकारी बरेच अज्ञानी व केवळ अंधश्रद्धाळू असल्यामुळें या पद्धतीनें धार्मिक आचारांचें व ग्रंथांचें समर्थन करण्याची शक्ति त्यांचे अंगीं नव्हती, तेव्हां " शेषं कोपेन पूरयेत् " या न्यायानें त्यांनीं दडपशाही सुरू केली. परंतु दडपशाही अंतीं पराभूत व्हावयाचीच, व त्याप्रमाणें हे धर्माचार व ग्रंथ हीं सर्व थोतांडें आहेत हें भौतिकशास्त्रज्ञांचें म्हणणेंच सर्वत्र मान्य होत चाललें हें मागें सांगितलें आहेच. अशा रीतीनें एक प्रकारची-खरी नव्हे--धर्मग्लानि विद्वान् लोकांत दिसूं लागली. ही धर्म-ग्लानि खरी नव्हे असें म्हणण्याचें कारण, धर्मग्लानीपासून उत्पन्न होणारी नीतिभ्रष्टता व विकारवशता, हीं विद्वान् लोकांच्या ठायीं उत्पन्न करण्याचें

सामर्थ्य त्या धर्मग्लानींत नव्हतें. परंतु अविद्वान्, अज्ञानी व विशेषतः तुटपुंजा ज्ञानाचे लोकांत मात्र त्याचा विपरीत परिणाम कालांतरानें दिसूं लागला. धर्माचे आचार, विचार व नियम हे बहुधा मनुष्यास नीतिमार्गावर अडकवून ठेवणारे असे निर्बंध असतात. ते अजाणपणानें पाळणारा मनुष्यसुद्धां अनीतिकर्मापासून परावृत्त होतो; त्याचे विचार अनीतिमूलक असले तरी, त्या धर्मबंधनांच्या योगानें, त्याचे हातून घडणारीं कृत्यें तितकीं अनीतिकारक होऊं नयेत, अशी त्यांची सामान्यतः योजना असते. कित्येक लोक भीतीनें, तर कित्येक केवळ सामाजिक चालीरीतींमुळें, बाह्यतः तरी नीतीनें वागत असतात; व त्यांस धार्मिक आचार मदत करीत असतात. म्हणून अशा लोकांमध्यें धर्म म्हणजे विशिष्ट आचार असा अर्थ नेहमीं असतो. तसें कबूल करणें कदाचित् त्यांस कमीपणाचें वाटत असेल, परंतु निःपक्षपाती मनुष्यांस आमचें म्हणणें मान्य होईल असें आम्हांस वाटतें.

विचारी व खरा सुशिक्षित अशा मनुष्याचे बद्धिपुरःसर प्रयत्न होऊन जे सिद्धांत ठरतात ते त्या समयीं जरी दूरपरिणामी दिसले नाहींत, तरी त्यांच्यांत सत्याचें असें कांहीं तेज असतें कीं, सामान्य लोकांत ते हळू हळू पसरत जातात; व म्हणूनच कोणत्याही राष्ट्राची प्रगति होत आहे किंवा पीछेहाट होत आहे, हें त्या राष्ट्रांतील सुशिक्षित लोकांच्या विचारांवरून व मतांवरून ताडतां येतें. एखाद्या राष्ट्राची कितीही भरभराट दिसत असली, तरी तेवढ्यावरूनच त्या राष्ट्राच्या भावी सुस्थितीची अटकळ बांधतां कामा नये; वर म्हटल्याप्रमाणें त्या राष्ट्रांतील सुशिक्षित भागाचे विचारांवरून ती चांगली ताडतां येते. आपल्या शरीरामध्यें जसा मेंदु, तसा राष्ट्रांमध्यें सुशिक्षित जनसमूह होय. जसा विचार तसा आचार, हा सिद्धांत व्यक्तीस तसा राष्ट्रासही लागू आहे. म्हणून राष्ट्रांतील विचारी मनुष्यांवर राष्ट्राचे आचार अवलंबून असतात. आतां विचारांचा हा आचारांत परिणाम होण्याचें कार्य घडून येण्यास अवधि मात्र कधीं कधीं बराच लागत असतो, हें विसरतां कामा नये.

ह्या गोष्टींचा निर्देश करण्याचें कारण इतकेंच कीं, वरील दोन प्रकारच्या कारणांनीं उत्पन्न होणाऱ्या धर्मग्लानीनें मनुष्यावर घडणाऱ्या परिणामाचा योग्य विचार करितां यावा. केवळ ऐहिक सुखलालसेनें उत्पन्न होणारी धर्मग्लानि, ही दीर्घपरिणामी व दीर्घकाल टिकणारी नव्हे; कारण ही लालसा सुशिक्षणाचा व विचाराचा परिणाम नसून, तो केवळ मनुष्याच्या पशुवृत्तीचा परिणाम होय. परंतु युरोपांत जी सांप्रत धर्मग्लानि उत्पन्न झालेली दिसते ती निराळ्या प्रकारची आहे. चिकित्सक पद्धतीनें विचार करण्याचें ज्यांचे अंगीं सामर्थ्य आहे, अशा सुशिक्षित वर्गानें आपल्या सामर्थ्यानुरूप विचार करून धर्मग्रंथ व धर्माचार हीं खुळचट ठरविलीं; परंतु त्यांच्यांतील विचारशक्तीमुळें ते नीतिभ्रष्ट झाले नाहींत. त्यांपैकीं जर कोणी तसे झाले असतील तर तो विचाराचा परिणाम नसून, त्यांच्यांतील पशुवृत्तीचा तो परिणाम होय. परंतु सामान्य लोकांस भीतीमुळें अगर चालत आलेल्या परंपरेमुळें धार्मिक ग्रंथांस पूज्य मानणें, धर्माचार पाळणें, धार्मिक कृत्यें करणें, पारलौकिक गोष्टींच्या प्राप्तीकरितां ऐहिक गोष्टींचा यज्ञ करणें इत्यादि गोष्टी करणें हें मूर्खपणाचें आहे, एवढी मात्र गोष्ट पटली. कारण त्यांच्या ऐहिक सुखलालसेला व पशुवृत्तीला ती पोषक होती. हक्स्ले, स्पेन्सर, ब्रॅडलॉ यांचा अज्ञेयवाद कोणीकडे, व सामान्य माणसांची धर्मच्युति कोणीकडे! यांची वस्तुतः तुलनाही होऊं शकत नाहीं. परंतु त्यांचा अज्ञेयवाद व जडवाद सामान्य लोकांच्या धर्मच्युतीस सहाय्य झाल्यामुळें या दोन गोष्टींस अत्यंत नाखुषीनें एकत्र मानणें अवश्य झालें.

पंचेंद्रियांस पटेल तेंच सत्य, बाकी सर्व मिथ्या, अशी वृत्ति झाल्याखेरीज भौतिक शास्त्राभ्यासास जोर येणें शक्य नव्हतें, म्हणून तशी वृत्ति होऊन भौतिक शास्त्रांचा उदय झाला. एका विशिष्टप्रकारच्या अज्ञानतमाचा नाश करण्याकरितां हा ज्ञानदीप लाविला गेला, परंतु त्याच समयीं त्या दीपापासून जडवादरूपी ( rank materialism ) थोडासा विषारी

वायु उत्पन्न झाला. प्रकाश तर पाहिजे, पण विषारी वायु नको अशी व्यवस्था करणें भाग पडलें, व त्यास अनुसरूनच **थिआसफिकल सोसायटीची उत्पत्ति झाली**. शिवाय धर्मग्रंथांच्या तुलनात्मक अभ्यासानें सर्व धर्मांतील अनेक गोष्टींतील साम्य निदर्शनास आणलें, व तें निर्विवाद स्थापित केलें. या साम्याचें कारण, मानवी अज्ञान, हें ठरविलें व तें अन्यकारणाभावीं विद्वान् लोकांनीं मान्य केलें. हा सिद्धांत युरोपियन शिक्षणानें विभूषित अशा लोकामध्यें जगभर पसरला; अर्थात् धर्मग्रंथ व धर्माचार हे पोरांचे खेळ आहेत, त्यांत कांहीं विशेष अर्थ नाहीं, अशी खात्री पटत चालली, सामान्य लोकांत त्याचा अनुवाद सुरु झाला, व यामुळें असलेली धर्मश्रद्धा उडत चालली. धर्मश्रद्धेवर अज्ञानाचा परिणाम घडल्यामुळें जीं अनेक खुळें माजून राहिलीं होतीं, तीं उघडकीस आलीं, व त्यांची थट्टा करणें हें विद्वत्तेचें लक्षण झालें. एकंदरींत धर्मलंडपणा हें सुशिक्षिततेचें चिन्हच होऊन बसलें. आचारास आळा घालणारे निर्बंध सुटत चालले व खऱ्या धर्मग्लानीचें बीजारोपण झालें. त्याचा वृक्ष बनून मानवजातीचें नुकसान होण्याची वेळ आली; अज्ञेयवाद व जडवाद हे मान्य होऊं लागले. सुशिक्षित लोकांनीं धर्म, धर्माचार हें सर्व झूट ठरविलें व धर्मग्लानीचीं मुळें पक्कीं होतात असें दिसूं लागलें. हीं मुळें तोडून टाकणें मानवहितार्थ अवश्य झालें.

ज्या मार्गानें हा विषवृक्ष लावला गेला, त्या प्रकारच्या मार्गानींच तो तोडणें अवश्य होतें; हें कार्य करण्याकरितां परिस्थितीस अनुसरून युरोप व अमेरिका या दोन खंडांत–त्यांतून विशेषतः अमेरिका खंडांत–जडवादास धक्के मारणारा एक पंथ निघाला—तो Spiritualism चा पंथ होय. ज्यास अद्भुत चमत्कार म्हणतात तसे चमत्कार या सृष्टींत होतात ही गोष्ट झूट आहे असें मानण्याची जडवादी भौतिक शास्त्रज्ञांची प्रवृत्ति होती. परंतु सत्यनिष्ठ अशा कांहीं स्त्रीपुरुषांनीं लोकनिंदेची पर्वा न करितां अशा कांहीं गोष्टी लोकांचें निदर्शनास सप्रमाण आणिल्या. त्या गोष्टी कशा घडतात हें

कांहीं शास्त्रज्ञांस उकलेना; तेव्हां या गोष्टीच मुळीं खोट्या आहेत असें म्हणण्याशिवाय दुसरा मार्गच त्यांस उरला नाहीं. शिवाय, कांहीं लबाड लोकांच्या खोट्या गोष्टी या कामीं उघडकीस आल्यामुळें, ज्या खऱ्या गोष्टी घडत त्यांवरही विश्वास बसेनासा होऊन, शास्त्रज्ञांचें म्हणणें सयुक्तिक दिसूं लागलें. परंतु अशा शास्त्रज्ञांच्या सिद्धांतांनीं न उकलणाऱ्या गोष्टी, इतक्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागल्या कीं, अनेक जाणत्या लोकांचें लक्ष त्यांकडे वेधलें, व spiritualists या नांवाखालीं ते लोक मोडूं लागले. मरणोत्तर माणसें सूक्ष्मरूपांत जिवंत असतात व त्यांपैकीं कांहीं हे चमत्कार करितात, भौतिक शास्त्राचे नियम त्यांस लागू नाहींत, अशा प्रकारचीं त्यांचीं मतें आहेत. या स्पिरिच्युॲलिस्ट लोकांनीं जड-वादास (materialism) पहिला व जबरदस्त धक्का दिला. पंचेंद्रियांस गोचर अशा सृष्टीपलीकडे आणखी कांहीं सृष्टि असावी, ती आपल्या मर्यादित शक्तींस आकलत नाहीं इतक्याकरितांच त्या सृष्टीचें अस्तित्व नाशाबीत धरणें रास्त नाहीं, हें त्यांनीं सिद्ध केलें. सर वुइल्यम क्रुक्स, सर आलिव्हर लॉज्, ॲलफ्रेड रसेल् वॉलेस् अशांसारखे दांडगे शास्त्रज्ञ त्यांस जाऊन मिळाले. या गोष्टीचा फायदा घेऊनच, मॅडम ब्लॅव्हॅट्स्की व कर्नल ऑल्कॉट यांनीं अद्भुत चमत्कारांचा अभ्यास करण्या-करितां अमेरिकेंत जिज्ञासू मंडळी जमविली, व ती पुढें **थिऑसफिकल सोसायटी झाली**. या सोसायटीच्या चालकत्वाचें पवित्र काम याच दोन कार्यक्षम माणसांकडे सोंपविलें गेलें.

आतां या दोन माणसांखेरीज या सोसायटीचें धुरीणत्व घेण्यास इकडे योग्यतेचीं माणसें त्या वेळीं नव्हतीं काय? अशा प्रकारचा आक्षेप पुढें मांड-ण्यांत येतो. त्याचप्रमाणें ब्रह्मविद्येच्या पुनरुज्जीवनाचें काम **हिंदूंकडून किंवा ब्राह्मणांकडून** व्हावयाला नको काय? असा प्रश्न पुष्कळ लोक करितात तेव्हां वरील आक्षेप व हा प्रश्न उकलण्याच्या आतां प्रयत्न करूं.

परमेश्वराचे वरीं, मानव हे येथून तेथून सारखेच असले पाहिजेत. ज्याच्या त्याच्या कर्मानुसार त्याची योग्यता कमी अगर जास्त व्हावयाची. मानवजातीचे कल्याणार्थ धर्मसंस्थापक सर्वत्र व सर्व काळीं येत असतात. हिंदुस्थानांत वेदव्यास, इराणांत झरदुष्ट्र, मिसर देशांत टॉथ अथवा हर्मीज, ग्रीस देशांत ऑरफीयस, ज्युडीयांत येशू-खिस्त, तसाच अरबस्थानांत महमद पैगंबर हे सर्व धर्मस्थापक हिंदु होते काय? अर्थात् नव्हते. तसेंच सर्व देशांतून जे साधु संत होऊन गेले, ते म्लेंच्छ, अतएव त्याज्य होत, असें मानणें हें व्यापक दृष्टीचें लक्षण होणार नाहीं.

हें विवेचन वाचणाऱ्यांमध्यें बरेचसे हिंदू असतील, व त्यांपैकीं बऱ्याच जणांचा आत्म्याचें अमरत्व व पुनर्जन्म यांवर विश्वासही असेल, (तसा ज्यांचा विश्वास नसेल त्यांच्याकरितां हा प्यारा नाहीं, असें समजावें.) त्यांस आम्ही नम्रपणें असें विचारतों कीं, वसिष्ठवामदेवादि ऋषि, तसेच आचार्यादि श्रेष्ठ पुरुष हे सगळे सांप्रत कोठें आहेत ? ते नष्ट झाले काय ? नष्ट झाले नसतील, तर ते देहधारी अथवा विदेही असे कोठेंतरी असतीलच. ज्यांनीं आपल्या भूलोकींच्या जन्मांत मानवांच्या आध्यात्मिक हिताकरितां अलोट प्रयत्न केले त्यांनीं, हा क्षुल्लक जडदेह टाकल्याबरोबर, त्या प्रयत्नांचा व मानवजनांच्या कल्याणाच्या संकल्पाचा त्याग केला काय ? तसें म्हणावें तर त्यांचे ज्ञानास तें कमीपणा आणणारें होईल ! ब्रह्मविदांचें म्हणणें असें आहे कीं, सर्व जीवात्मे अमर अमृत, ते आपापलीं कार्यें सतत करीत असतात व जीवन्मुक्त आपण अंगीकारलेल्या कार्यांत सदा मग्न असतात. हें म्हणणें युक्तीस सोडून दिसत नाहीं. अशा जीवन्मुक्तस्थितींतील सत्पुरुषांस महात्मे ( Mahatme ) म्हणणें हेंच योग्य आहे, कारण ते खरोखरच महा–आत्मे होत. [ मिस्टर लेडबीटर यांनीं ‘ अड्यारटॉक्स ’ अथवा ‘ इनर लाइफ ’ नांवाचा सुंदर ग्रंथ लिहिला आहे. त्यांत महात्मे ह्मणजे काय याचें उत्कृष्ट

विवेचन केलें आहे, तें वाचण्याची आम्ही जिज्ञासूंस शिफारस करितों.]
एखाद्या गोष्टीवर आपला विश्वास बसत नाहीं, कारण ह्याचा आपणास अनुभव नाहीं, हें म्हणणें सयुक्तिक आहे. परंतु तेवढ्याच कारणानें ती गोष्ट झूट आहे, तें सारें ढोंग आहे असें म्हणणें म्हणजे शुद्ध दांडगाई होय; असो. तेव्हां पूर्वीचे ऋषिजन, किंवा त्यांपैकीं कांहीं, पृथ्वीचे पाठीवर हल्लीं आहेत असें कोणीं म्हटलें तर प्रथम दर्शनीं कपाळास आंठ्या पडाव्या कीं आनंद व्हावा ? ते अमुक स्थळीं आहेत असें स्पष्टपणें सांगत असतां, त्या स्थळांचा शोध न करितां, असें असणें शक्यच नाहीं असें ठाम सांगून देणें, हें कोणत्या न्यायशास्त्रानें सयुक्तिक ठरवितां येईल बरें ! तेव्हां त्यांतील कांहीं ऋषींनीं, सांप्रत अज्ञानांधकारांत चांचपडत फिरणाऱ्या लोकांना सन्मार्ग दाखविण्याकरितां, जडदेह धारण केला, असें कोणीं सांगितलें असतां त्यास शशविषाण अथवा वंध्यापुत्र मानण्याचें, निदान आत्म्याचें अमरत्व व पुनर्जन्म यांवर विश्वास ठेवणाऱ्या हिंदूस तरी, बिलकुल कारण नाहीं. असो.

भौतिक शास्त्राच्या ज्ञानानें व त्या ज्ञानाच्या विचारसरणीनें अप्रत्यक्ष रीतीनें पण धर्मग्लानि झाली व ती मानवजातीच्या कायमच्या नुकसानीस कारणीभूत होणार असें पाहून, अशा दयाघन जीवन्मुक्तांस करुणा यावी हें साहजिकच आहे; व म्हणून त्या धर्मग्लानीच्या नाशार्थ त्यांनीं यत्न करावा हें उचित आहे. ते ज्ञाते आम्हां अज्ञानी लोकांच्या तब्बेतीस जुळेल असेंच आपलें वर्तन ठेवतील, अशीच पद्धति स्वीकारतील, व त्याचप्रमाणें ते विशिष्ट धर्मांतील, विशिष्ट देशांतील व विशिष्ट वर्णांतीलच असतील, असें मानणें योग्य नाहीं. जीवन्मुक्तांस राष्ट्रांराष्ट्रांतील, धर्मांधर्मांतील भेद महत्वाचे नाहींत. त्यांस मानवजातीच्या हिताची काळजी असणार, तेव्हां ज्या मार्गानें अत्यंत कमी परिश्रमानें कार्य होईल, तोच मार्ग त्यांनीं स्वीकारावा हें त्यांच्या

अगाध ज्ञानास योग्य आहे. " योगः कर्मसु कौशलं " हें योगाचें लक्षण आहे. कार्य उत्कृष्ट होऊन त्यास श्रम व शक्ति यांचा खर्च अत्यंत कमी करणें म्हणजेच कौशल्य. तेव्हां त्यांच्या योजनेवर आम्ही आमचे धर्म, देश, वर्ण वगैरेंतील क्षुद्र भेद लक्षांत घेऊन टीका करणें म्हणजे मिण मिण दिव्यानें सूर्यनारायणास प्रकाश कसा द्यावा हें शिकविण्यासारखें आहे. धर्मग्लानि घालविण्याकरितां त्यांस जो कोणी योग्य वाटेल त्याचा उपयोग करून घेण्यास त्यांस पूर्ण अधिकार आहे. आम्हां अज्ञजनांच्या बहुमताची त्यांस बिलकुल अवश्यकता नाहीं. परंतु या सर्व कामांत इतकी गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, ते न्यायी सत्पुरुष कोणावरही जबरदस्ती करूं इच्छित नसतात; तें त्यांचें शीलच नव्हे. आम्ही सर्व आपणांस योग्य वाटेल त्याप्रमाणें वागण्यास स्वतंत्र आहों. त्यांतूनच आम्हांस मार्ग दाखविण्याकरितां केवळ दयेनें प्रेरित होऊन हे जीवन्मुक्त आम्हांस सहाय्य करीत असतात; व त्याकरितां वेळ व प्रसंग पाहून आपल्या ज्ञानानें ते योग्य माणसांची योजना करितात. ज्या ठिकाणीं विशेष अवश्यकता नाहीं, त्या ठिकाणीं आम्ही सामान्य मानवजन आपल्या बुद्ध्यनुसार मार्ग क्रमित असतों. परंतु या मार्गक्रमणांत खांच-खळ्गे ज्या मानानें जास्त त्या मानानें सहाय्य उपलब्ध असण्याची अवश्यकता जास्त असते. म्हणून प्रसंगानुसार आम्हांस सत्यज्ञान व सन्मार्ग मिळावा या इच्छेनें ते आपल्या शिष्यप्रशिष्यांस मुद्दाम पाठवितात तर कधीं ते स्वतः जडदेह धारण करून आम्हांमध्यें वावरतात. अर्थात् त्यांना धर्म, देशवर्ण, लिंगवर्ण इत्यादिकांची मर्यादा मुळींच नसते.

आजकाल पृथ्वीच्या पाठीवर पाश्चिमात्य लोकांचें प्राबल्य आहे. इतरांपेक्षां ते संख्येनें जास्त आहेत असें नाहीं; परंतु सांप्रत त्या मानववंशाकडे जणूं तो अधिकार आहे, त्याप्रमाणें त्यांचे अंगीं विशिष्ट गुणही आहेत. कारण कांहीं असो, तशी वस्तुस्थिति आहे, ही निर्विवाद गोष्ट आहे. त्यांच्या प्रसाराबरोबरच त्यांच्या चिकित्सक विचारसरणीचा प्रसार

जहाला व वर सांगितल्याप्रमाणें भक्कम पायावर धर्मग्लानीची स्थापना होण्याची वेळ आली. तेव्हां त्यांच्यांतीलच माणसें ह्या धर्मग्लानीस आळा घालण्याचा प्रयत्न करण्यास जास्त योग्य वाटून निवडलीं जावीं यांत विशेष आश्चर्य नाहीं. कोणतेंही कार्य अंगीकृत केलें म्हणजे त्याकरितां संघटित प्रयत्न करून आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व प्रशंसनीय उद्योगप्रियतेनें तें रंगारूपास आणण्याची हातोटी या पाश्चिमात्यांस फारच उत्तम साधली आहे. याचा पुरावा निदान हिंदी लोकांस निराळा देण्याचें कारण नाहीं. म्हणून कार्य कुशलतेनें होण्याकरितां त्यांच्यांतील माणसांची योजना व्हावी ह्यांत आश्चर्य नाहीं.

शिवाय ही गोष्ट लक्षांत बाळगणें अवश्य आहे कीं, आध्यात्मिक उन्नतीकरितां होणारी मदत हिंदूलोकांकरितां म्हणूनच नाहीं तर अखिल मानवांकरितां आहे. त्यांत हिंदू व इतर सर्वच लोक येतात. सद्गुरूंच्या घरीं मुक्तद्वार असतें. आम्हांस मात्र अभिमानानें तें मर्यादित केल्यानें आनंद वाटतो इतकेंच. करितां हिंदू किंवा ब्राह्मण अगर एखाद्या विशिष्ट जातीकडेच अशा सर्वव्यापी संस्थेचें चालकत्व असावें असें हट्टानें सांगणें हें अगदीं अनुचित होय. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें, मॅडम् ब्लॅव्हॅट्स्की व कर्नल ऑल्कॉट हीं माणसें योग्यतेचीं होतीं म्हणूनच तीं या सोसायटीचे धुरीणत्वाचे कामास निवडलीं गेलीं. या उभयतांनीं, आम्ही महात्मे आहों, अगर साधु पुरुष आहों, असें कधींही म्हटलेलें नाहीं. उलट, आम्ही सद्गुरूचे दास आहोंत, त्यांनीं सांगितलेलें कार्य आपापल्या अक्कलहुशारीप्रमाणें करीत आहोंत असेंच तें सांगत असत. मॅडम ब्लॅव्हॅट्स्की[1] ह्या रशियन होत्या. हिंदुस्थानांत इ. स. १८५१ चे सुमारास येऊन व हिमालयांत राहून, तेथें आपल्या गुरूपाशीं त्यांनीं अभ्यास केला, व त्यांचे

---

१ या बाई रशियन असून थिऑसफीवरील आपले सर्व ग्रंथ त्यांनीं आंग्ल भाषेंत लिहिले आहेत.

आज्ञेनुसार ब्रह्मविद्येच्या पुनरुज्जीवनाचें कार्य त्यांनीं स्वीकारिलें. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत प्रामाणिकपणा व सत्यनिष्ठा यांबद्दल नांवाजलेले कर्नल ऑल्कॉट यांचें सहाय्य घेऊन त्यांनीं अमेरिका खंडांत थिऑसफिकल सोसायटीची स्थापना इ. स. १८७५ सालीं केली. हल्लीं ही सोसायटी सर्व जगभर पसरली आहे. विद्याविभूषित अशा एकोणीस देशांत सोसायटीचें प्रेमाच जाळें पसरलें आहे. तसेंच पृथ्वीचे पाठीवर या संस्थेचे सुमारें वीस हजार सभासद असून त्यांतील अजमासें पांच हजारच हिंदुस्थानांत आहेत. असो.

माणसांमाणसांमध्यें, धर्म, देश, लिंगवर्ण इत्यादिकांमुळें वितुष्ट वाढून, अज्ञानानें मानवजातीचें नुकसान होत आहे हें लक्षांत आणून, विश्वबंधुत्वाची अथवा सर्वात्मभावाची जाणीव मान्य होणाऱ्या कोणाही मनुष्यास, या संस्थेमध्यें, मेंबर म्हणून दाखल होतां येतें असें ठरविलें. सर्व मानवजातीच्या कल्याणाकरितां झटणाऱ्या जीवन्मुक्त ऋषींची माहिती लोकांपुढें–त्यांस ती खरी वाटणार नाहीं असें वाटत असूनही त्यांनीं मांडिली; तसें करणें त्यांस अवश्य वाटलें. त्या गोष्टीचें त्यांस प्रत्यक्ष ज्ञान होतें, व तें ज्ञान लोकांपुढें मांडण्यानें आपलें उद्दिष्ट कार्य होईल, हें लक्षांत घेऊन त्यांनीं जगास असें जाहीर केलें कीं, अनेक धर्मसंस्थापक, तसेंच सर्व पृथ्वीवर झालेले साधुसंत हे नष्ट झालेले नसून कोणी जडदेहांत तर कोणी सूक्ष्मदेहांत हयात आहेत. त्यांस अनुकूल असतील त्या मार्गांनीं, मानवजातीच्या उन्नतीकरितां ज्याचे त्याचे योग्यतेस अनुसरून सहाय्य करण्यास सदा तत्पर असणाऱ्या अशा जीवन्मुक्तांचा संघ आहे; त्यांमध्यें व्यवस्थित रचना आहे व त्या रचनेस अनुसरूनच मानवजातीच्या कल्याणाचे प्रयत्न सलोख्यानें व सत्यानें त्यांचेकडून होत असतात. त्यांच्यामध्यें आपापसांत विरोध नसतो. विरोध हा अज्ञानजन्य असतो. ते तर ज्ञानी आहेत. ते "योगस्थः कुरु कर्माणि" या कोटींतील असल्यामुळें त्यांचीं कार्यें अत्यंत सुव्यवस्थित होत असतात. अशा या सिद्धसंघांतून अथवा त्यांचे आज्ञेवरून वेळो-

वेळीं मानवहितार्थ ब्रह्मविद्येचें अंशतः ज्ञान देण्याकरितां योग्य स्त्रीपुरुष अवतरत असतात. अशा ज्ञात्यांनींच धर्मसंस्थापना केलेल्या आहेत; व म्हणूनच धर्माधर्मांमध्यें मुळांत साम्य असतें. विरोध येतो तो पुढें त्या धर्मानुयायांच्या अज्ञानाचा परिणाम असतो. ज्या लोकांस ज्या काळीं जें आध्यात्मिक ज्ञान देणें अवश्य असतें तें त्यांचेकडून दिलें जातें; व तें लोकांस समजेल अशा रीतीनें सांगण्यांत येतें; व यावरून तुलनात्मक पुराणग्रंथाभ्यासी लोकांनीं प्रस्थापित केलेलें साम्य कबूल करून, त्या साम्याचें कारण मानवी अज्ञान असें जें त्यांनीं ठरविलें होतें व जें मान्य करणें लोकांस अवश्य वाटूं लागलें होतें, तसें तें नसून, ईश्वरी ज्ञान हें त्या साम्याचें कारण आहे, असा सिद्धांत त्यांनीं लोकांपुढें मांडला, व तो सिद्ध करून पाहण्याची ज्यांची इच्छा होती त्यांस तो मार्ग त्यांनीं सुलभ करून दिला. अशा रीतीनें जडवाद व अज्ञेयवाद यांस विरोध करून युक्तीस पटेल अशा पद्धतीनें धर्मग्लानि नष्ट करण्याचा उपक्रम झाला. धर्मसंस्थापनेपेक्षां धर्मग्लानिनाश, हें ह्या सोसायटीचें प्रथमचें कार्य होतें व त्याप्रमाणें तें कार्य जारीनें चालूही आहे.

आतां अशा या उपयोगी संस्थेवर बऱ्याच लोकांचे **आक्षेप व शंका** आहेत. त्यांतील मुख्य मुख्य घेऊन त्यांचा विचार करूं. जे लोक थिऑसफीसंबंधानें आपल्या इकडे आक्षेप घेतात त्यांस असें वाटत असतें कीं, आपणां हिंदू लोकांस बाटवून ख्रिस्ती करण्याचें हें एक ढोंग आहे; किंवा तत्वज्ञानापुरतें तरी हिंदु लोकांस जें श्रेष्ठत्व आहे तें नष्ट करून, म्हणजे तें तत्वज्ञान इंग्रजी भाषेंत आणून, व त्या भाषेमार्फत तें शिकवून, आपलें तें श्रेष्ठत्व नष्ट करावें; असें केल्यानें वामनानें बळीस पाताळांत गाडिल्याप्रमाणें हिंदु लोक कायमचे खालावतील, असा ह्या सर्व खटपटींत हेतु असावा. ह्या संस्थेचे हेतु असे आहेत असें जर सिद्ध होईल तर त्या सोसायटीचा अत्यंत जोरानें निषेध करणें आपणां प्रत्येकाचें

कर्तव्य होईल; पण वस्तुस्थिति तशी आहे कीं नाहीं, याचा आपल्या उदार हिंदु शीलास अनुसरून विचार केला पाहिजे. पूर्वग्रह झुगारले पाहिजेत व नंतर काय तें मत बनविलें पाहिजे.

युरोपांत थिऑसफीविरुद्ध ख्रिस्तधर्मीयांचेही आक्षेप आहेत. त्यांपैकीं एक असा आहे कीं, थिऑसफिकल सोसायटी हिंदु धर्माचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करते आणि मोठ्या युक्तीनें व खुबीनें हिंदुधर्म व बौद्धधर्म ह्यांची तरफदारी करून ख्रिस्तीधर्म नष्ट करण्याची तिची खटपट आहे. ह्यास स्पष्ट आधार ते असा देतात कीं, मॅडम् ब्लॅव्हॅट्स्की व कर्नल् ऑल्कॉट् हे बुद्धधर्मानुयायी होते. हिंदुस्थानांत एका मोठ्या शहरीं, मिसेस बेझंट येणार अशी बातमी लागतांच त्या शहरांतील रोमन क्याथॉलिक लोकांस, त्यांच्या धर्मगुरूनें मुद्दाम बोलावून, त्या बाईच्या व्याख्यानास जाऊं नका, असा हुकूम फर्माविला ! ख्रिस्ती मिशनरी थिऑसफिकल सोसायटीचा अत्यंत द्वेष करितात. कारण थिऑसफीच्या उपदेशानें मिशनऱ्यांच्या पोटावर पाय येण्याचा संभव आहे. मिशनऱ्यांच्या कारस्थानांनींच कूलॉंब प्रकरण माजून, मॅडम् ब्लॅव्हॅट्स्कीस व सोसायटीस पुष्कळ त्रास झाला होता. आतां तत्वज्ञानासंबंधाचा आक्षेप पाहूं जातां, भगवद्गीता, उपनिषदें, ब्रह्मसूत्रें, भाष्यें, पुराणें इत्यादि ग्रंथांत ब्रह्मविद्या आतिशय भरली आहे तिचें संशोधन करा, असें कंठरवानें सांगणारी सोसायटी त्या ग्रंथांची अभिमानी कीं द्वेष्टी समजावयाची ? आतां दुरभिमानास बळी न पडतां व सत्यास स्मरून बुद्धांचे त्रिपीटिकादि ग्रंथ, ख्रिस्त्यांचें बायबल, महंमदीयांचें कुराण, इत्यादि सर्व धर्मग्रंथ जे आहेत त्यांतही ब्रह्मविद्या आहे; त्यांत ती जास्त प्रच्छन्न आहे, तीही पहा, असें सांगणें म्हणजे हिंदी तत्वज्ञानाचा उपहास करणें व त्यांचें श्रेष्ठत्व नष्ट करण्याचा प्रयत्न करणें, असें कोणत्या सत्यप्रिय मनुष्यास म्हणतां येईल बरें ?

'थिऑसफी' म्हणजे 'ब्रह्मविद्या;' ती सर्व धर्मपंथांची जननी असल्याकारणानें कोणत्याही धर्मपंथास ती विघातक होणें शक्यच नाहीं; ब्रह्मविद्या ही माता व धर्मपंथ हीं तिचीं लेंकरें. त्या लेंकरांचा नाश करण्यास ती उद्युक्त कशी होईल? आणि जर ती तशी होईल तर ती आई नसून पूतना आहे असेंच समजलें पाहिजे. धर्मपंथांस उज्ज्वलता आणणारी, त्यांचें पोषण करणारी व त्यांच्या ठिकाणीं घाण असेल ती धुऊन त्यांस निर्मळ करणारी अशी ब्रह्मविद्या असलीच पाहिजे; मग ती थिऑसाफिकल सोसायटीच्या विद्यमानें बाहेर पडो अथवा दुसऱ्या मार्गानें पडो. म्हणूनच थिऑसफीचें ज्ञान ग्रहण करून अत्यंत प्रेमानें व आनंदानें गीता वाचतां येते, तसेंच बायबलही वाचतां येतें. 'ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आध्यात्मिक ग्रंथांचा मुकुटमणि आहे,' (Dnyaneshwari is a king of mystic works) असे जे मॅडम् ब्लॅव्हॅट्स्कींनीं उद्गार काढले आहेत ते धर्म बुडविण्याचें लक्षण आहे कीं गुणग्राहकतेचें लक्षण आहे, याचा वाचकांनींच विचार करावा.

कचित् असाही आक्षेप ऐकूं येतो कीं, थिऑसफीनें धर्मश्रद्धा, भक्ति हीं नष्ट होतात. वस्तुस्थिति याच्या थेट उलट असतां हा आक्षेप येण्याचें असें कारण आहे कीं, धर्मामध्यें किंवा धर्माचारांमध्यें जर कांहीं वेडगळ समजुती प्रचालित झाल्या असल्या, तर ब्रह्मविद्येच्या सत्प्रकाशानें त्या बाहेर पडतात; व तसें झालें म्हणजे त्या वेडगळ समजुतींस धर्म हें पवित्र नांव देणाऱ्या लोकांस धर्म बुडाला असें वाटतें! मुलांमध्यें कांहीं दुर्गुण असतांना तो आईनें अगर शिक्षकानें काढून टाकिला असतां आपणांस बुडविलें, फसविलें, असें मुलांस वाटण्यासारखीच ही स्थिति आहे. विपरीत गोष्टींस धर्म मानलें म्हणजे तो सत्याच्या कसोटीस कसा उतरेल? कसोटी लाविली नाहीं, तोंपर्यंत आपला अलंकार उत्तम आहे, तो बावन्नकशी आहे, असें वाटत असतांना तो कसोटीस कमी ठरला, तर ती कसोटीची चूक

होईल काय ? आपला दागिना कमी कसाचा आहे, असें ज्ञान होतांच सकृद्दर्शनीं हानि झाल्यासारखें वाटणें साहजिक आहे. परंतु किंचित् विचाराअंतीं स माधानच वाटणार आहे. हा धर्म बुडविण्याचा आरोप .ऑसफिकल सोसायटीवर, हिंदु व बौद्धधर्मीयांपेक्षां ख्रिस्ती वगैरे धर्मीयां-कडूनच जास्त येत असतो. पण त्याहूनही मौजेची गोष्ट अशी कीं, धर्म म्हटल्याबरोबर ज्यांच्या कपाळास आंठ्या चढतात अशा जडवादी व अज्ञेयवाद्यांकडून, तसेंच धर्मसुधारक म्हणविणाऱ्या एकेश्वरी मतवाद्यां-कडून थिऑसफी ऊर्फ ब्रह्मविद्येवर वरील आक्षेपाच्या थेट उलट आक्षेप घेण्यांत येत असतो ! ते म्हणतात कीं, थिऑसफी लोकांस धर्मभोळी करूं लागली आहे. भलभलत्या अशक्य गोष्टींचें ती प्रतिपादन करते, व मनु-ष्याच्या मनावर विपरीत परिणाम करून, आपण करूं पाहात असलेल्या सुधारणांस ही अत्यंत अडथळा करिते. म्हणजे धर्मपंथी व धर्मपंथहीन लोक, असे परस्परविरोधी आरोप थिऑसफीवर करितात कीं, त्यांस उत्तर देण्यापेक्षां त्यांची त्यांची परस्पर गांठ घालून देणेंच जास्त श्रेयस्कर होणार आहे !

आतां हे आक्षेप वेडगळपणानें अगर खोटेपणानें करण्यांत येतात असें मात्र म्हणण्याचा आमचा हेतु नाहीं. अज्ञेयवादी, जडवादी, एकेश्वरी इत्यादि लोक जरी तत्वतः भिन्न मताचे असले तरी सामान्यतः पंचेंद्रियांनीं होणारें ज्ञान तेवढें सत्य बाकीचें सर्व मिथ्या, असें समजण्यांत त्यांची एकवाक्यता असते. मला कळतें तेवढेंच ज्ञान; मला दिसतें तेवढें दृश्यजग, असें वाटणें हा कूपमंडूकवृत्तीचा परिणाम आहे. न्यायानें पाहतां ‘ अ ’ स दिसतें तें ‘ ब ’ स दिसत नाहीं, एवढ्यावरूनच त्या वस्तूचें अस्तित्व नाशावित होत नाहीं. तसें जर होतें तर निरक्षर मनुष्यानें साक्षर मनुष्य पुस्तक वाचतो ती सारी लबाडी आहे, असें म्हटलें तर त्यांत कांहीं गैर होणार नाहीं. आतां ‘ब’ नें ‘ अ ’ ला तें दिसतें एवढ्याच पुराव्यावरून त्या वस्तूचें अस्तित्व

वाटल्यास मान्य करूं नये; परंतु तें वस्तुतः नाहींच असें म्हणण्यास 'ब' ला आधार नाहीं, हा न्याय होय. परंत तिकडे लक्ष न देतां वरील जडवादी वगैरे मंडळी त्यांस दिसत नाहींत त्या सर्व गोष्टी झूट असें मानूं लागतात. हा अन्याय आहे. असा निवाडा करण्यापूर्वी प्रत्यक्षाखेरीज इतर प्रमाणां-चाही विचार करणें अवश्य असतें. परंतु भौतिक ज्ञानाच्या ज्ञातसिद्धांतांवर यांची इतकी दृढ श्रद्धा असते कीं, अशा गोष्टींचें अस्तित्व क्षणभर मानून त्या गोष्टींचें कार्यकारण शोधण्यापेक्षां ती वस्तु अस्तित्वांतच नाहीं असें मानणें त्यांस जास्त सोयीवार वाटतें. हा सर्व तामस गुणाचा खेळ होय. धर्मानुयायांत जसे ( dogmatic ) हटवादी लोक असतात तसेच शास्त्रज्ञ ह्मणविणारांतही असतात. त्यामुळें असा घोंटाळा होतो. असो. तेव्हां या उभयविरोधी पक्षांचे आघात घेत घेत थिऑसफिकल सोसायटीस आपला मार्ग क्रमणें अवश्य आहे. आतां थिऑसफिकल सोसायटीच्या मार्फत कांहीं असत्य गोष्टी जाणतेपणें अगर अजाणतेपणें प्रतिपादन केल्या गेल्या तर त्यांची वाट काय ? असा प्रश्न येईल. त्यास आमचें स्पष्ट उत्तर असें आहे कीं, तशी गोष्ट झाल्यास ती गोष्ट थिऑसफी अथवा ब्रह्मविद्या नव्हे. " सत्यान्नास्ति परोधर्मः " हें ब्रह्मविद्येचें लक्षण आहे. असत्य गोष्ट ब्रह्म-विद्येंत समाविष्ट कशी होईल ? प्रकाशांत अंधार कसा बसेल ? तसा बसला आहे असें वाटल्यास तेथें प्रकाशाभाव आहे इतकें ओळखलें म्हणजे पुरे.

थिऑसफिकल सोसायटीच्यामार्फत सांगितली जाईल तेवढीच ब्रह्मविद्या, असें मानणें चुकीचें आहे, असें आम्हीं प्रथमच स्पष्टपणें सांगितलें आहे. तसेंच हेंही सांगून ठेवणें आम्हांस अवश्य दिसतें कीं, थिऑसफिकल सोसायटींतील अधिकारी मानले जाणारे लोक सांगतील तें सर्व सत्य-वेद-प्रमाण-असेंही मानण्याचें कारण नाहीं. आपल्या बुद्धीच्या कसोटीनें त्याचें परीक्षण करावें, सत्य वाटल्यास ग्रहण करावें, असत्य वाटल्यास व तसें त सिद्ध करतां आल्यास तसें निदर्शनास आणावें. त्या गोष्टीनें थिऑसफि-

कल सोसायटीवर व मानवजातीवर त्यांचे अत्यंत उपकार होतील. आपण सांगतों तें खरें, तें खोटें असें सिद्ध केलें तरी कबूल करावयाचें नाहीं अशी वृत्ति धारण करणें हें ब्रह्मविद्येच्या पुनरुज्जीवनाच्या अंगीकृत कार्यास विघातक आहे. सत्यज्ञान सर्वत्र पसरावें व तें अधिकारानुरूप प्रत्येकास मिळावें, हा तर ही सोसायटी स्थापण्याचा हेतु आहे. तसें झालें तरच ह्या सोसायटीच्या उद्देशत्रयीपैकीं विश्वबंधुत्व अथवा सर्वात्मभाव हा श्रेष्ठ उद्देश कल्पनासृष्टींत आनंद देणारा इतकाच न राहतां, तो सृष्टींतील एक सत्यसिद्धांत आहे असें ज्ञान होऊन, तसें वर्तन जास्त जास्त होऊं शकेल.

## या सोसायटीचे उद्देश

जे प्रसिद्ध झाले आहेत ते येणेंप्रमाणेः--

१ जाती, धर्म, लिंग, वर्ण, अथवा रंग, इत्यादिकांस आड येऊं न देतां, मानवजातींतील विश्वबंधुत्वाचा एक केंद्र बनविणें.

२ धर्म, तत्वविज्ञान, व शास्त्रें यांच्या तुलनात्मक अभ्यासास उत्तेजन देणें.

३ सृष्टींतील अज्ञात नियम व मनुष्यांमधील गुप्त शक्ति यांच्यासंबंधीं शोध करणें.

## पहिला उद्देश.

या उद्देशत्रयींपैकीं पहिला उद्देश ज्यास मान्य आहे त्यास थिऑसफिकल सोसायटीचा सभासद होतां येते, हें मागें सांगितलेंच आहे.

जो कोणी या सोसायटीचा सभासद होतो त्यास आपला धर्म सोडावा लागतो, अशी जी कांहीं लोकांत समजूत झालेली आढळते ती केवळ भ्रामक आहे; कारण हा पहिला उद्देश मान्य असला ह्मणजे बाकी कोणतेंही बंधन सोसायटी सभासदांवर लादीत नाहीं. शिवाय, सर्व धर्म हीं ब्रह्मविद्येचींच निरनिराळीं

स्वरूपें आहेत असें प्रतिपादन करणारी सोसायटी 'आपला धर्म सोडा' असें म्हणेल तरी कशी ? उलट पूर्वकर्मानुसार ज्या धर्मांत जो मनुष्य जन्मास आला असेल, त्यानें त्याच धर्मांत राहून, ब्रह्मविद्येच्या सहाय्यानें आपल्या धर्माचा रहस्यार्थ ओळखून, स्वधर्मीयांस मदत करावी, असेंच या सोसायटीचे सभासदांस विनविण्यांत येत असतें. असो.

पहिल्या उद्देशाप्रमाणें विश्वबंधुत्वाचा केंद्र बनविण्याची खटपट सोसायटीनें करावयाची असें ठरविलें आहे. विश्वबंधुत्व बनविणें अथवा प्रस्थापित करणें अशी शब्दयोजना तेथें नाहीं, कारण विश्वबंधुत्व वस्तुतः नवीन बनवावयाचें नाहीं. तें आहेच. तें ओळखून आपल्या सर्वांच्या जीवनक्रमांत तें उतरावें हें आपलें काम आहे. मुळांत nucleus हा शब्द आहे. जीवनेंद्रियशास्त्रांत ( Biology ) nucleus म्हणजे केंद्र याचा असा अर्थ आहे कीं, प्रत्येक सजीव पेशींत ( Cell ) जिवंतपणाचा जणूं झराच असा एक भाग असतो; त्या पेशींत जी सजीवता येते ती त्या केंद्रांतून एकसारखी बाहेर पडत असते. त्याप्रमाणेंच या सोसायटीची अशी रचना करण्यांत संस्थापकांचा असा हेतु आहे कीं, मानवजातीमध्यें विश्वबंधुत्वाची कल्पना एकसारखी पसरत राहावी, व त्या कल्पनेचा एक केंद्र ही सोसायटी व्हावी. या सोसायटीखेरिज इतर कोणी हें काम करीत नसतील किंवा करूं शकणार नाहींत असें संस्थापकांचें अगर चालकांचें म्हणणें नाहीं; परंतु ही सोसायटी मात्र या उद्देशानेंच स्थापन झालेली आहे.

विश्वबंधुत्व जर वस्तुतः सृष्टींतिल एक सत्य गोष्ट आहे तर ती प्रस्थापित करण्यास इतका खटाटोप कां असावा, असा एक प्रश्न उद्भवण्यासारखा आहे. परंतु ह्यासारखीं अनेक सत्यें सृष्टींत आहेत. सृष्टपदार्थांमधील नियम हे अबाधित आहेत. शोधक लोक ते नियम बनवूं शकत नाहींत. परंतु त्यांचा शोध करून त्याबद्दल लोकांची खात्री पटवून, त्याविरुद्ध असलेल्या समजुतींचा फोलपणा सिद्ध करून तो सत्यसिद्धांत स्थापित करावा लागतो

मनुष्याचें ज्ञान व तज्जन्य अभिमान हीं त्याच्या सत्यकृत्यांस विरोध करितात. समयविशेषीं त्याचे प्राणांचा बळी घेतात. याचीं उदाहरणें कोपर्निकस, ग्यालिलियो इत्यादिकांच्या चरित्रांत आढळून येतात.

गुरुत्वाकर्षणाप्रमाणेंच सर्वात्मभाव अथवा विश्वबंधुत्व हा सृष्टींतील सत्यसिद्धांत आहे. परंतु त्याचें सप्रमाण ज्ञान होण्यास अधिकार लागतो. कांहीं लोक तें नाहींच असें म्हणतात, व कांहींस ती गोष्ट तशी असेल तर बरी असें वाटतें. फक्त ज्ञात्या लोकांस मात्र त्याबद्दल अपरोक्षानुभूति असते व म्हणून त्यांचें वर्तन त्यास धरून असतें. ज्यांच्या तर्कबुद्धीस हें बंधुत्वाचें नातें पटतें त्यांचें सर्व वर्तन त्यास अनुसरूनच असतें असें नाहीं. यास कारण वस्तुतः विश्वबंधुत्वाचें त्यास प्रत्यक्ष ज्ञान नसतें हेंच होय.

विश्वबंधुत्वाचें नातें प्रेमावर अवलंबून आहे. या प्रेमाची अत्युत्कटता म्हणजेच भक्ति अथवा योग, व त्याचा अभाव म्हणजे विभक्ति अथवा वियोग. हा प्रेमप्रवाह अव्याहत वहात असेल तर, विश्वबंधुत्वाचें नातें ओळखा, असें सांगण्याचें प्रयोजनच राहणार नाहीं. विश्वबंधुत्व हा त्या प्रेमप्रवाहाचा परिणामच आहे. कारणें कांहीं असोत, परंतु असा प्रेमप्रवाह मानवजातींत आज निदान अव्याहत वहात नाहीं इतकेंच नव्हे तर विरोधच नानातऱ्हेनें मानवांमानवांमध्यें जारीनें प्रचलित आहेत. तेव्हां विश्वबंधुत्वाचें नातें ओळखून तें प्रस्थापित व्हावें असा ज्यांचा हेतु आहे, त्यांना प्रथम हे अनेक विरोध नाहींसे करणें अवश्य होतें. विरोध म्हणजे भिन्नता नव्हे. भिन्नता असली म्हणजे विरोध असलाच पाहिजे, असें बिलकुल नाहीं. तेव्हां मनुष्यांमनुष्यांमध्यें ज्या गोष्टी विरोध उत्पन्न करितात त्या मुख्यतः पहिल्या उद्देशांत प्रतिपादन केल्या आहेत. या उद्देशाकडे वरवर पहाणाऱ्या लोकांस—विशेषतः हिंदूंस—बऱ्याच वेळां भय वाटतें. हा सबगोलंकाराचा यत्न आहे असें ते ठरवितात व लागलीच थिऑसफिकल सोसायटी ही आपला

धर्म बुडविण्यास आली आहे, अशी आपली समजूत करून घेतात. सब्र्- गोलंकार याचा अर्थ भेद, भिन्नत्व यांचा पूर्ण नाश; अर्थात् वर्ण, जाति इत्यादिकांचा संकर करणारी ही कलियुगांतील संस्था आहे असें त्यांस वाटूं लागतें. पण हा भ्रम आहे. भेदभाव प्रेमप्रवाहाच्या आड येऊं देऊं नये, एवढाच या उद्देशाचा अर्थ आहे.

या सोसायटीच्या मेंबरांत कांहीं सब्र्गोलंकार करावा असें म्हणणारे लोक असतील, पण त्याची जोखीम सोसायटीवर नाहीं. सोसायटीच्या नियमाप्रमाणें तसें केलें पाहिजे असें त्यांस बंधन नाहीं. तें त्यांचें स्वतःचें मत आहे व त्याप्रमाणें ते वागतात.

एक भेद नष्ट केला तरी तेथें दुसऱ्या प्रकारचा भेद उत्पन्न व्हावयाचा, हा या भेदपूर्ण सृष्टीचा नियमच आहे. तेव्हां भेदाच्या नाशाचा विचार न करितां, त्या भेदबुद्धीमुळें प्रेमप्रवाहास विरोध येऊन विश्वबंधुत्वास जी आडकाठी येते तिचा विचार या सोसायटीस करावा लागतो, व म्हणूनच मानवांमध्यें विरोध व वितुष्टें उत्पन्न करणारे जे मुख्य भेद त्यांस प्रेमाचे आड येऊं देतां कामा नये, असें पहिल्या उद्देशांत निदर्शित केलें आहे. बंधुत्वाच्या नात्यासंबंधानें आणखी एक विपरीत कल्पना असते. एका ताटांत बसून खाणेंपिणें–सब्र्गोलंकार करणें, असा आपल्या इकडे त्याचा विपरीत अर्थ करितात. पश्चिमेकडे त्याचा विपरीत अर्थ समता ( equality ) असा करितात. हे दोन्ही अर्थ वास्तविक अर्थास सोडून आहेत. एका मातापितरांच्या पोटीं आलेल्या मुलांत तरी समता असते काय ? निदान वयाचा तरी भेद असतोच व त्याबरोबरच ज्ञान, बुद्धि, शील, रूप, इत्यादि अनेक गोष्टींतही त्यांचेमध्यें फरक असतो. तसाच वसुधैवकुटुंबांतही असावयाचाच. आपण सारे आकाशांतील बापाचीं लेंकरें आहोंत असें पाद्री लोकांचे बोल, व त्यांचा सब्र्गोलंकार करण्याचा हेतु या दोन गोष्टींमुळें विश्वबंधुत्वाच्या कल्पनेवर सब्र्गोलंकारपणाचा आरोप

आला, व फ्रान्स देशांतील रक्तपाताच्या राज्यक्रांतीच्या उत्पादकत्रयीमुळें (liberty, fraternity, equality) बंधुत्वांत समानपणा शिरला. ऐहिक गोष्टींपैकीं कित्येकींत हा समानपणा योग्य व इष्टही असेल, परंतु तेवढ्यावरून हरएक रीतीनें सर्व जीवात्मे समान आहेत, असें सिद्ध होत नाहीं. बंधु शब्दा-पासून हा घोंटाळा उत्पन्न झाल्यासारखा दिसतो. यापेक्षां सर्वात्मभाव हा शब्द universal brotherhood याचा अर्थ जास्त चांगला व्यक्त करूं शकतो. हें बंधुत्व ह्मणजे ' सर्वांभूतांठायीं परमेश्वर, सोहं, लाइलाह इल्लेल्लाह, एकमेवा-द्वितीयं, Fatherhood of God and Brotherhood of Man ' इत्यादि महावाक्यांवरून निघणारा नीतिमार्ग होय. त्या शब्दांत प्रत्येकानें इतरांशीं कसें वागावें याचें तत्व भरलेलें आहे. सर्वत्र आत्मबुद्धि ठेवणें म्हणजे बंधुत्व होय. आपलें शरीर अनेक अवयवांचें बनलेलें आहे व त्या अवयवां-मध्यें अत्यंत भिन्नत्व आहे. तथापि त्या शरीरभर एकच अहंभाव जागृत असून त्यांपैकीं कोणा एका अवयवास दुःख झालें असतां त्याचा कळ-वळा सर्वत्र उत्पन्न होतो व त्या दुःखाचें निवारण करण्याचें ज्या ज्या दुसऱ्या अवयवास सामर्थ्य असतें तो तो त्या उद्योगास लागतो. असें बंधुत्व शरी-रांतील अवयवांत, स्नायूंत व पेशींत असतें तोंपर्यंतच त्यांचें बनलेलें शरीर जिवंत राहतें. शिवाय ज्या मानानें हें साहाय्य करण्याचें सामर्थ्य जास्त त्या मानानें तें शरीर जास्त सुदृढ असतें. तशीच सर्वात्मभावाची गोष्ट आहे. आत्मौपम्यानें ही गोष्ट बरोबर कळते. यावरून इतर कोणासही सहा-य्याची जरूर असेल तर तें करण्याची बुद्धि व तत्परता असणें हें बंधुत्वाचें लक्षण होय. अशी बुद्धि न राहण्याचें कारण स्वार्थ, स्वार्थाचें कारण अज्ञान, तत्परता नसण्याचें कारण तमस् व तमस् हा अज्ञानजन्यच होय. माझें हित इतरांच्या हिताहून वेगळें आहे, इतरांचें हित म्हणजे त्या मानानें माझें अहित, ही समजूत अज्ञानजन्य आहे; परंतु ती सर्वत्र दिसत आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. ऐहिक विषयांसंबंधानें ती गोष्ट खरीही आहे. शरीर मी अशी अज्ञानजन्य भावना झाली कीं, तिचा परिणाम विश्वबंधुत्वाची अथवा

सर्वात्मभावाची हानि, हा झालाच पाहिजे. ती भावना खोटी आहे. आपण कोण, हें आपणास ओळखत नाहीं; तें ओळखिलें पाहिजे. " Know thyself." आत्मज्ञान झालें पाहिजे. तें होईल त्या मानानें सर्वात्मभाव वाढेल असें तज्ज्ञ लोकांचें अधिकारवाणीनें सांगणें आहे. तेव्हां इतरांस साहाय्य करण्याची बुद्धि व तत्परता हें या बंधुत्वाचें खरें चिन्ह आहे, असें ओळखून त्याचे आड काय काय येतें याचा विचार करणें, सोसायटीच्या संस्थापकांस जरूर झालें. हिंदु म्हणतो हा म्लेंच्छ, याच्याशीं मला काय करावयाचें आहे? उलटपक्षीं म्लेंच्छ म्हणतो कीं हिंदू हे काफीर आहेत! हे युरोपियन म्हणून आशियांतील लोक नाकें मुरडतात, तर आशियाटिकांस तुच्छ करावें असें युरोपियनांस वाटतें. काळा अदमी व गोरा अदमी हा वर्णभेद आजकाल अत्यंत जाज्वल्य तऱ्हेनें सर्वांचे दृष्टीपुढें आहे. बरें, एका धर्मांत तरी सलोखा असतो म्हणावें तर प्रत्येक धर्मांत शेंकडों पंथ असून त्यांचेमध्यें वितुष्टें व मारामाऱ्या सुरू आहेतच.

तेव्हां हे जे माणसांमाणसांमध्यें वितुष्ट पाडणारे भेद, माणसांच्या प्रेमप्रवाहास अडथळा करणारे फरक, ते विश्वबंधुत्वास आड येऊं न देतां खऱ्या बंधुत्वाचें केंद्र बनविणें हाच थिऑसफिकल सोसायटीचा हेतु आहे. अर्थात् ज्या ठिकाणीं साहाय्याची जरूरी असेल त्या ठिकाणीं साहाय्य करण्याची बुद्धि तात्कालिक उत्पन्न होऊन तिची पात्रतेप्रमाणें अंमलबजावणी झाली म्हणजे विश्वबंधुत्व दृग्गोचर होऊं लागलें असें समजावें. बंधुत्व प्रस्थापित झालें म्हणजे जेथें साहाय्य करणें शक्य असेल तेथें तें करण्यास–आनंदानें करण्यास–तयार असावें असें वाटूं लागलें पाहिजे. त्या इष्टसिद्धीचे आड जें जें येईल तें तें नष्ट झालें पाहिजे. अशी ही प्रेमबुद्धि सहज उद्भवली पाहिजे; व त्या गोष्टीस अनुसरून करामतही झाली पाहिजे.

आतां प्रेमबुद्धि उत्पन्न होण्याचे आड धर्म, जात, रंग वगैरे येतात असें सांगितलें, तेव्हां हे अडथळे दूर करण्यास

## दुसरा उद्देश

निर्दिष्ट केलेला आहे व त्याप्रमाणें त्यास उपाय सुचविला आहे. धर्म, तत्वज्ञान व शास्त्रें, यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यानें ह्यांपैकीं बरेच अडथळे दूर होतील. निरनिराळ्या धर्मांचे लोकांत परस्परांबद्दल जी तिरस्कारबुद्धि आहे तिचें कारण इतर धर्मांसंबंधीं गाढ अज्ञान होय. सांप्रत कोणीं तसा इतर धर्मांचा अभ्यास केलाच, तर कावळा जशीं क्षतें शोधितो तद्वत् छिद्रांचे अन्वेषणाकरितां तो अभ्यास होतो; तसें न करितां सहानुभूतिपूर्वक व बंधुत्वाच्या बुद्धीनें जर इतर धर्मग्रंथांचा अभ्यास केला तर प्रेमप्रवाहास येणारा मोठा विरोध नाहींसा करितां येईल. त्याप्रमाणेंच तत्वज्ञानाची गोष्ट. दुसऱ्याचें मत आपल्यास तंतोतंत मान्य झालें तरच प्रेम उत्पन्न होतें अशांतली गोष्ट नाहीं. बहुतेक वेळां भिन्नमतानुयायांवर लबाड, स्वार्थी, मतलबी, असे आरोप जरी स्पष्टपणें नसले तरी मनांतून करण्यांत येतात. मतभिन्नता असतांना सुद्धां ती प्रामाणिक आहे, अशी खात्री पटली म्हणजे तेथें द्वेषास जागा राहात नाहीं; व तसें झालें म्हणजे प्रेमप्रवाह हळू हळू सुरू होतो व बंधुत्वास जागा होते. शास्त्रें ( sciences ) यांच्यासंबंधानेंही हीच रड. जे थोर शास्त्रज्ञ आहेत त्यांनीं स्वार्थबुद्धि सोडून शास्त्राभ्यासाकरितांच देह धारण केले आहेत. ते विश्व बंधु आहेतच, पण बाकीच्या शास्त्रविद्यार्थ्यांत माझें शास्त्र खरें, हेंच जास्त उपयोगाचें, अशी बुद्धि दृष्टीस पडते; अर्थात् इतर शास्त्रांस तो तुच्छ लेखूं लागतो, व त्याचा परिणाम स्वतःच्या शास्त्राचा कमीपणा हा होतोच; शिवाय बंधुत्वाच्या ओघासही तो आडकाठी उत्पन्न करितो. फार कशाला, एकाच शास्त्रांत देशकालपरत्वानें तंटे असावे काय? आंग्लवैद्य'

आर्यवैद्य, युनानीवैद्य, यांचें किती सख्य असतें हें सर्वांस ठाऊकच आहे. ॲलोपाथि व होमिओपाथि यांचें भांडणही जगजाहीर आहे. असे एक ना दोन, मनुष्याच्या आकुंचित बुद्धीनें, स्वार्थानें व अहंपणानें सरस्वतीच्या, पवित्र मंदिरांत सुद्धां मारामारी सुरू असते. ती नष्ट होणें अवश्य आहे. या सर्व तुलनात्मक अभ्यासास उत्तेजन देऊन माणसांमाणसांतील बंधुत्वाचे भावनेस साहाय्य करणें, हा या सोसायटीचा दुसरा उद्देश झाला.

## तिसरा उद्देश.

विश्वबंधुत्वाची अर्थात् परहिताची बुद्धि जागृत झाल्यानेंच केवळ काम संपत नाहीं. तिची अंमलबजावणी झाली पाहिजे. भूक लागली ह्मणजे अन्न खावें ही बुद्धि उत्पन्न झाल्यानेंच काम भागत नाहीं. तें पैदा करून त्याचें ग्रहण करावें लागतें. ह्मणजे त्या बुद्धीस अनुसरून अंमलबजावणी करावी लागते. तसेंच बंधुत्वाची बुद्धि उत्पन्न झाली कीं सहाय्य करण्याची निर्बलता उलट त्यास त्रास देऊं लागते, व साहजिकच तें सामर्थ्य आपल्या अंगीं आणण्याचा तो प्रयत्न करूं लागतो. याकरितां सर्व तऱ्हेचें सामर्थ्य वाढविणें अवश्य होतें. स्वार्थी मनुष्य सर्व तऱ्हेचें सामर्थ्य वाढविणें हीच इच्छा करितो; पण तो आपण मोठें व्हावें, आपला मान व दरारा वाढावा, या हेतूनें प्रेरित असतो. उलटपक्षीं बंधुत्वबुद्धीनें प्रेरित झालेला मनुष्य तसाच प्रयत्न करितो. पण तो दुसऱ्यास सहाय्य करण्यास जास्त पात्रता यावी ह्मणून करीत असतो. दुसऱ्यावर प्रेम असून त्यास सहाय्य करण्याची बुद्धि असली तर तेवढ्यानेंच कार्यभाग उरकत नाहीं. माता अज्ञानी असली तरी तिचें आपल्या बालकावर प्रेम नसतें असें कोण ह्मणेल ? त्यास साहाय्य करावें असें तिला वाटतच असतें; परंतु ज्ञानाभावीं कित्येक वेळा तिच्या कृतीपासून बालकाचें अकल्याणच होतें. त्याप्रमाणेंच विश्वबंधुत्वाची कल्पना आवडली परंतु ज्ञान नसलें तर होईल. दुसऱ्यास आवडेल तें

करणें म्हणजे त्यास साहाय्य करणें असें पुष्कळांस वाटतें. पण तसें नेहमीं नसतें. त्याचें खरें कल्याण ज्यापासून होईल तें साहाय्य खरें आणि म्हणूनच संपूर्ण ज्ञानसंपादनाचा मार्ग तिसऱ्या उद्देशांत सांगितला आहे. सृष्टींतील नियमांचा शोध म्हणजे सांख्य व मनुष्यांच्या गुप्त शक्तींचा शोध म्हणजे योग, असें पारिभाषिक शब्दांनीं ढोबळपणें म्हणतां येईल. या दोन्ही प्रकारच्या अभ्यासांनीं आपलें ज्ञान व सामर्थ्य वाढून दुसऱ्यास खरें साहाय्य करितां येईल. Only the wise man can be wisely helpful म्हणजे शहाण्या मनुष्यासच शहाणपणानें साहाय्य करतां येतें असें जें म्हटलें आहे तें खरें आहे. आतांपर्यंत या बंधुत्वाबद्दल जो विचार केला तो सार्वत्रिक व सर्वव्यापी आहे. अर्थात् तो हिंदुस्थानासही लागू आहे. सर्व मानवजातीच्या उन्नतीकरितां हा यत्न आहे; त्याबद्दल शांतपणें विचार केला तर या देशास बुडविण्यास ही सोसायटी आली आहे, असा जो एक आक्षेप घेण्यांत येतो तो सयुक्तिक दिसत नाहीं. कारण आडमार्गीत न शिरतां सत्यवादास अनुसरल्यास हा आक्षेप निरर्थकच ठरतो. करितां ही सोसायटी आपल्या ह्या हिंदुस्थानास बुडविण्याकरितां उत्पन्न झालेली नसून तिच्या स्थापनेपासून **हिंदुस्थानास उपयोग** आहे. तो काय आहे व येथील प्रचलित धर्मांवर तिचा परिणाम काय घडला किंवा घडण्याचा संभव आहे, याचा आतां आपण विचार करूं.

हिंदुस्थान हा शब्द त्याच्या यौगिक अर्थाकडे पहातां हल्लींचे काळीं सार्थ नाहीं. कारण त्या देशास आपला देश म्हणविणारे सर्व लोक हिंदु नाहींत. मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती हेच काय पण जे जे धर्म या पृथ्वीवर आहेत त्या सर्वांचे थोडेबहुत अनुयायी ह्या देशास स्वदेश म्हणत आहेत. या कारणानेंच हल्लीं हिंदी हा शब्द या एकराष्ट्र होऊं पाहणाऱ्या देशांतील लोकांस लावण्याचा चांगला प्रघात पडूं लागला आहे. बौद्ध धर्माचा जन्म येथें खरा, परंतु त्याचे अनुयायी या देशांत थोडे होते.

ब्रह्मदेश इंग्रजी साम्राज्यास जोडल्यामुळें, तसेंच अगदीं नजिक असणारें सिंहलद्वीप ब्रिटिश साम्राज्याचें घटक असल्यामुळें तो धर्मही बहु-संख्येनें ह्या भावी राष्ट्रांत समाविष्ट झाला आहे. अशी ही खिचडी चांगली कीं वाईट, ह्या गोष्टीचा येथें उहापोह करण्याची अवश्यकता नाहीं. शिवाय ती स्थिति बदलणें हें आपल्या स्वाधीनही नाहीं. अशी स्थिति आहे, ही गोष्ट वाचकांनीं आपल्या नजरेपुढें ठेवावी, इतकीच विनंति आहे.

हिंदुस्थानचा फार जुना इतिहास उपलब्ध नाहीं, तथापि आपल्या कार्या-पुरते ठळक प्रसंग आपणांस माहीत आहेत. भारतीय युद्धाचे पूर्वींची हिंदु-स्थानची स्थिति पाहतां आर्यांनीं तो देश पादाक्रांत करून त्यास आपला स्वदेश म्हटलें. ऑस्ट्रेलिया अथवा अमेरिका जसा आतां गौरकायांचा देश झाला आहे, तसाच हिंदुस्थान आर्यांचा स्वदेश झाला असला पाहिजे. येथें त्यांचें राज्य नांदून या नंदनवनासारख्या व सृष्टिदेवीच्या पूर्ण रूपेंतील लाडक्या देशास सर्व तऱ्हेनें अपार वैभव प्राप्त झालें होतें. ऐहिकदृष्ट्या संपत्ति अपरंपार झाली होती, व येथें सोन्याचा धूर निघत होता. पारमार्थिक दृष्टीनें तत्वज्ञान व धर्म यांची विलक्षण वाढ होऊन, लोक वर्णाश्रमधर्मानुसार आपापलीं विहित कार्यें करून आनंदांत होते. परंतु येथें उत्पन्न झालेलें ज्ञान व द्रव्य दुसऱ्यांस मिळणें कठिण होतें. उत्तरेकडे गिरींद्र हिमालय व दक्षिणेकडे महासागराचें अभेद्य वलय अशा नैसर्गिक कडेकोट बंदोबस्तांतून आंत प्रवेश करणें फार कठीण होतें; परंतु माणसाची महत्वाकांक्षा व लोभ या संकटांतूनही आंत शिरण्यास प्रयत्न करीत होतीं. त्या सर्वांस, केवळ लढाई करणारा बलसागर क्षात्रियवर्ग आपल्या दराऱ्यानें मज्जाव करीत राहिला होता. संपत्तीच्या वाढीस, त्याप्रमाणेंच आत्मविद्येचे वाढीस, बाहेरचा उपसर्ग घातुक असल्यामुळें, या बंदोबस्ताचा फार उपयोग झाला. तथापि हें ज्ञान व ही संपत्ति विशिष्ट लोकांनींच यावच्चंद्रदिवाकरौ आपलीं म्हणून बाळगावीं,

तीं दुसऱ्या कोणास मिळूं नयेत अशी विलक्षण रीत सृष्टिरचनेची कशी असूं शकेल ? तेव्हां हिंदुस्थानच्या बाहेरील आपल्या दरिद्री बंधूंस हिंदुस्थानांत येण्याचा मार्ग सुगम होणें अवश्य होतें. या जगाचें चालकत्व ज्याचेकडे आहे तो त्यांतूनच, असलेल्या परिस्थितीचा उपयोग करून उपाय काढितो. लोभादि विकारांनीं घडवून आणलेलें भारतीय युद्ध हें अशा उपायांपैकींच एक होय. त्या महायुद्धांत कौरव, पांडव व पुढें यादव, या सर्वांचा नाश होऊन, या देशाचें संरक्षण करणारें बाहुबल एकाएकीं नाहीसें झालें. या गोष्टीचा फायदा घेऊन बाहेरच्या लोकांनीं अंतःप्रवेश करण्याचा यत्न बरींच शतकें सुरू ठेविला होता. शेवटीं इराणी, ग्रीक, मोंगल, वगैरे लोक द्रव्याचे लोभानें हल्ले करून लूट नेऊं लागले; त्यांबरोबरच कांहीं लोक येऊन येथील तत्वज्ञान व योगशास्त्र संपादन करून गेले. परंतु हिंदुस्थानांतील रहिवासी या वेळीं मुख्यतः हिंदूच होते. कारण हे परकीय लोक लूट मिळवून बाहेर जात असत.

अगदीं अलीकडे मुसलमान लोकांनीं येथें कायमचा तळ दिला व आपलें राज्य स्थापन केलें. लढाया करून, राहिलेल्या क्षत्रियहिंदूंचा त्यांनीं नाश करण्याचा सपाटा चालू ठेविला. तरवारीच्या जोरावर हिंदूंचे मुसलमान बनूं लागले; व सर्व हिंदुस्थानांत हिंदु शेवटीं राहतो कीं नाहीं अशी वेळ येऊं लागली. हिंदुधर्माची व हिंदुलोकांची मानवजातीच्या कल्याणार्थ अवश्यकता नसती तर तो धर्म व ते लोक मुसलमानांच्या बाहुबलापुढें टिकले नसते. परंतु भवितव्यता निराळी होती; आणि म्हणूनच, एखाद्या क्षेत्राचे ठिकाणीं, पर्वकाळीं जसे जिकडून तिकडून लोक जमून उत्साह साजरा करितात त्याप्रमाणें एक, दोन, दहा, वीस नव्हे तर शेंकडों संत या महाराष्ट्रांत व आसमंतांत जन्मास येऊन शिवरायाच्या आगमनाची तयारी करीत राहिले. शिवाजी निर्माण होऊन त्यानें मुसलमान

लोकांची लाट थोपवून धरिली. ही स्थिति होण्यापूर्वीं पांच पन्नास वर्षें जर कोणीं अशा रीतीनें हिंदुधर्माचें रक्षण होणें शक्य आहे असें ह्मटलें असतें, तर त्याची वेडगळांतच गणना झाली असती. परंतु अशी अनपेक्षित गोष्ट घडून आली आणि मुसलमानांच्या प्रवाहास धरण पडलें. याप्रमाणें हें कार्य सुरू असतांना, त्याच समयीं पाश्चात्य लोक, केवळ व्यापाराकरितां हिंदुस्थानांत येऊन, कांचमण्यावर धनसंपादन करीत होते. त्या वेळीं, शिवाजीनें या पाश्चात्यांच्यासंबंधीं अगदीं तटस्थ वृत्ति धरिली होती, ही गोष्ट लक्षांत वाळगण्यासारखी आहे. असो. येथील हिंदुमुसलमानांतीलच नव्हे, तर हिंदूहिंदूंतील, भावाभावांतील भांडणें लक्षांत घेऊन पुढें पाश्चात्य लोकांनीं तराजूच्या दांडीऐवजीं तरवार घेतली, व आपल्या शहाणपणाच्या, चातुर्याच्या व विशेषतः शिस्तीच्या जोरावर ब्रिटिश राज्य हिंदुस्थानांत प्रस्थापित केलें. आह्मांस राजकीय विषयाचा येथें उहापोह करावयाचा नाहीं, परंतु असलेल्या वस्तुस्थितीकडे लक्ष देणें अवश्य आहे. एकछत्री ब्रिटिश साम्राज्य हिंदुस्थानावर झालें व त्यामुळें हिंदीराष्ट्र बनण्याचें बीज रोविलें गेलें. एक सत्ता उत्पन्न झाली. सर्वत्र कायदेबद्ध राज्यपद्धति प्रस्थापित झाली. आपसांत कितीही भेदभाव असले तरी राजकीय दृष्ट्या सर्वांचीं सुखदुःखें एक झालीं. राजभाषा एक झाल्यामुळें शेंकडों कोसांवरील लोकांमध्यें सलोख्याचें दळणवळण सुरू झालें. त्यांत आगगाड्या, आगबोटी, टपाल, तारायंत्रें इत्यादिकांनीं प्रवास सुकर व सत्वर झाला. एकंदरींत एकराष्ट्रत्व आणण्यास बाह्य उपचार कल्पनेपलीकडे निर्माण झाले. राहतां राहिलें धर्मभिन्नत्व. धर्मभिन्नत्वच नुसतें नव्हतें, तर एका धर्मांतच अनेक पंथ होते व तेही परस्पराविरुद्ध. अशा स्थितींत अत्यंत दूरदर्शी ब्रिटिश मुत्सद्यांनीं धर्मासंबंधानें औदासीन्य धरिलें. त्यांत त्यांचा हेतु आपल्या साम्राज्यास धक्का बसूं नये हाच होता. पण त्याचा परिणाम असा झाला कीं, हे भिन्नधर्म व धर्मपंथ जेथल्या तेथें तसेच जीव धरून राहिले; व त्यावरोबरच त्यांच्या अनुयायांतील द्वेष कायमचा धुमसत राहिला. मात्र त्यांस एक-

मेकांचीं डोकीं फोडण्याची सवड न देणारा असा वरून बंदोबस्त आहे म्हणूनच अशीं डोकीं हल्लीं फुटलेलीं दिसत नाहींत. धर्माधर्मांमध्यें स्नेह-भाव नसला तरी सांप्रत निदान औदासीन्य दिसतें; पण हें औदासीन्य दिखाऊ आहे. यावरून, या एकराष्ट्र होऊं पाहणाऱ्या हिंदुस्थानांत धर्मांतील विरोध व द्वेष, हा एक मोठा रोग आहे. पृथ्वीवरील अनेक देशांच्या इतिहासाकडे पाहतां धर्माच्या नांवावरच रक्तपात जास्ती झालेले आहेत. तेव्हां धर्मांत अशी कांहीं जबरदस्त जादू भरलेली असली पाहिजे कीं, बाकी हितसंबंध एक झाले, व धर्मश्रद्धा राहून त्यांत विरोध, तीव्रविरोध-भेद नव्हे—राहिला तर ते लोक फार वेळ एकत्र नांदणार नाहींत. धर्म ही बाब क्षुल्लक नाहीं. तशी ती असती तर सरकारास त्याबद्दल इतकी तीव्र तटस्थ वृत्ति धरण्याचें प्रयोजन नव्हतें. तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार करून आज हिंदुस्थानांतील रहिवाशांची जी स्थिति आहे, ती वर्णन करावयाची म्हणजे या देशांत अनेक धर्म, व प्रत्येक धर्मांत अनेक पंथ असें असून, त्या प्रत्येकाचे अनुयायी ब्रिटिश राज्यछत्राचे आश्रयानें बाह्यतः तरी सलोख्यानें एकत्र नांदत आहेत. ज्या धर्माच्या लोकांना, इतर धर्मांतील लोकांस आपल्या धर्मांत सामील केल्यानें महत् पुण्य लागतें असें वाटत नाहीं, ते आपला धर्म संभाळून स्वस्थ बसतात. परंतु इतर धर्मांचें तसें होत नाहीं. हिंदु, पारशी व यहुदी धर्मांचे लोक इतर धर्मीयां-बरोबर भांडतांना आढळले तर तें स्वसंरक्षणार्थ होय. परंतु ख्रिस्ती, मुसलमानी वगैरे धर्मांची गोष्ट तशी नाहीं.

आतां प्रवासादि साधनें, व एकछत्री साम्राज्य, तसेंच सर्व जगाशीं परिचय इत्यादि अनेक गोष्टींनीं हिंदुस्थानवासीयांतील सुजाण पुढाऱ्यांत एक-राष्ट्रीयत्वाची कल्पना येऊन तिनें चांगला जोर धरला आहे; व ती गोष्ट घडून येण्याकरितां स्वार्थत्यागपूर्वक यत्न सुरू आहे; पण ज्या घटकांचा हा राष्ट्रपुरुष बनविण्याचा विचार आहे त्यांत नानाधर्म व नानापंथ आहेत,

या गोष्टीकडे या पुढाऱ्यांचें जावें तितकें लक्ष गेलेंलें दिसत नाहीं. त्यांतील बरेच लोक पाश्चात्यविद्येनें सुसंस्कृत झालेले असल्याकारणानें, त्यांतील कोणी जडवादी तर कोणी अज्ञेयवादी, कोणी एकेश्वरीसमाजी तर कोणी लोकप्रियतेपुरते बाहेरून धर्मनिष्ठ, असेच जास्त आहेत. ही मानवी हृदयांतील परमेश्वराकडे धांव घेऊं पाहणारी ज्योत कधींही मालवितां येणार नाहीं. या गोष्टीवर त्यांचा फारसा भरंवसा नाहीं. राजकीय हितसंबंध, ऐहिक सुखप्रवृत्ति, फार तर जन्मभूमीवरील प्रेम अशा गोष्टींतील गुप्त शक्तींवर राष्ट्र टिकेल असें त्यांस वाटतें. या सर्व शक्तींहून धर्माची शक्ति अमर व जाज्वल्य आहे त्याची कल्पना त्यांस होत नाहीं.

आपण एखाद्या दुसऱ्या गोलावरूनच या पृथ्वीकडे पाहूं या. अशा अत्यंत विस्तृत दृष्टीनें या पृथ्वीवरील मानवजातीचा इतिहास पाहिला तर असें दिसेल कीं, पृथ्वीवरील अनेक धर्म-संस्थापना, त्यांचें आपापल्या अनुयायांस साहाय्य व नंतर हिंदुस्थानच्या पुण्यभूमींत ब्रिटिश राज्याच्या एकछत्राखालीं अशा अनुयायांचें मोठ्या प्रमाणांत जमा होणें, या गोष्टी उगीच आपोआप झाल्या नाहींत. तशी कल्पनाही करण्यास आमचें मन कचरतें. हा जो बाहुल्यांचा नाच चाललेला आहे त्यांत कांहीं तरी हेतु असावा, असें वाटल्यावांचून राहवत नाहीं. एकराष्ट्रत्वाची कल्पना व त्याकरितां परमपूज्य दादाभाई नौरोजी, बद्रुद्दिन तय्यबजी, माधवरावजी रानडे, तसेच त्यांचे साहाय्यकारी उदारमताचे ब्रिटिश लोक यांची खटपट ही उगीच करमणूक आहे, असें वाटत नाहीं. या सर्वांत ईश्वराचा कांहींतरी हेतु दिसतो. जसें नाटकांत पहिल्या अंकापासून जुळत जुळत शेवटीं कांहीं कार्य झालेलें दिसतें तसें या पृथ्वीरूपी रंगभूमीवर हें मोठें नाटक होत आहे व हिंदुस्थानच्या धर्मक्षेत्रावर त्या नाटकाचा शेवट आनंदपर्यवसायी होणार आहे, असें वाटण्यास अनेक

कारणें दिसत आहेत. त्यांतील अत्यंत महत्त्वाचें कारण **थिऑसफिकल सोसायटी** होय, असें आमच्या अल्पमतीस वाटल्यावांचून राहत नाहीं.

पूर्वीं ह्मटलेंच आहे कीं, धर्मज्योत ही मालवितां येत नाहीं. मनुष्याच्या हृदयांतून ती नष्ट होऊं शकत नाहीं. मात्र त्या ज्योतीच्या शक्तीचा परिणाम चांगला अगर वाईट होणें हें धर्मासंबंधानें सत्यज्ञान असणें अगर नसणें यावर अवलंबून राहील. धर्माधर्मांमध्यें विरोध हा अज्ञानाचा परिणाम होय. भिन्नता म्हणजे विरोध नव्हे, हें मागें सांगितलेंच आहे. या जगांत भिन्नता ही अणुरेणूंत भरलेली आहे. तशी ती धर्मांत राहीलच व तशी राहणें इष्टही आहे. जशीं अनेक प्रकारचीं विद्यापीठें असून तीं सर्व एका विश्वविद्यालयांत समाविष्ट असतात, व भिन्नता असून, विरोध न करितां सरस्वतीची एकनिष्ठ सेवा करितात, तद्वतच अनेक धर्मपंथ असूनही विरोध न करतील, तर मानवजातीचें शाश्वत कल्याण होईल. तेव्हां भिन्नता राहून विरोध नाहींसा कसा होईल, हा महत्वाचा प्रश्न उत्पन्न होतो. हा प्रश्न सोडविण्याचें काम थिऑसाफिकल सोसायटीनें आपले माथीं घेतलें आहे. ब्रह्मविद्या ही एक असून, मनुष्यास ती शिकविली जावी म्हणून त्यास पचेल अशा बेतानें थोडथोडी ती त्यास देण्यांत येते, व त्यासच धर्मपंथ असें नांव प्राप्त होतें. देश, काल, परिस्थिति व अधिकार यांस अनुलक्षून ब्रह्मविद्येचे हे खंड सारखे असूं शकत नाहींत. सारखें नसणें म्हणजे भिन्नता, परंतु त्या भिन्नतेंत विरोध मानणें हें अज्ञानाचें लक्षण. तें अज्ञान दूर करावें, धर्माधर्मांतील भिन्नता कायम ठेवून त्यांतलि विरोध नाहींसा करावा, धर्म ही महत्वाची गोष्ट आहे हें सशास्त्र सिद्ध करून व युक्तीस पटवून सुशिक्षित विद्वानांची खात्री होईल अशीं साधनें जमवावीं, व विश्वबंधुत्वास अत्यंत पोषक जो धर्म त्याची जी हल्लीं विपरीत स्थिति झाली आहे ती नष्ट करावी, तसेंच धर्माधर्मांतील विरोधास सुज्ञांच्या डोक्यांत थारा मिळूं नये, व सर्वात्मभावाची जागृति व्हावी

एतदर्थ थिऑसफिकल सोसायटीचे यत्न चालू आहेत त्यांत यश येईल किंवा नाहीं, हा स्वतंत्र प्रश्न आहे. यश खास येईल, असें अनेक कारणांमुळें प्रस्तुत लेखकास वाटत आहे. परंतु तेवढ्यामुळें वाचकांस तसें वाटलेंच पाहिजे असें म्हणण्याचें तो धार्ष्ट्य करीत नाहीं. मात्र इतकें निर्विवाद आहे कीं, कोणत्या कां उपायानें होईना, पण हा धर्मांतील विरोध नष्ट होणें अवश्य आहे. हें काम सोपें नव्हे. आतां कांहीं लोक धर्मांतील विरोध नष्ट होत नसेल तर धर्मच नष्ट करावा, म्हणजे विरोधही नष्ट होईल, असा उपाय सुचवितात; तसें करणें शक्य असतें तर कार्य झालें असतें, परंतु आमचें ठाम मत असें आहे कीं, कितीही कालपर्यंत धर्मज्योति दिसत नाहींशी वाटली तरी ती नष्ट होणें शक्य नाहीं. व्यक्त सृष्टि अस्तित्वांत आहे तोंपर्यंत धर्म आहे, ही गोष्ट लक्षांत घेऊन धर्मांतील विरोध नाहींसा करणारी कोणतीही सयुक्तिक योजना मानवकल्याणेच्छु पुरुषानें आनंदानें मान्य केली पाहिजे.

त्यांतून हिंदुस्थानास तर त्याखेरीज गत्यंतर नाहीं. सर्व भिन्न धर्मांचे लोक येथें विश्वसूत्रधाराच्या कौशल्यानें जमले आहेत. त्यांचेमधील विरोध नष्ट झाला तर मानवजातीच्या उन्नतीस केवढी तरी मोठी मदत करण्याचें श्रेय आम्हां भारतीयांस प्राप्त होऊन, जगभर आनंद नांदेल; तसें न केलें तर विरोध धुमसत राहून सर्वांची कालाच्या महोदरांत केव्हां तरी आहुति पडेल. हा विरोध नष्ट करण्याच्या पवित्र कार्यास थिऑसफिकल सोसायटी हातभार लावीत आहे. तेंच कार्य अन्य कोणी करीत असतील तर त्याबद्दल थिऑसफिकल सोसायटीस हेवा वाटणार नाहीं, तर उलट अत्यंत आनंद होईल. थिऑसफिकल सोसायटी रहावी, तिची थोरवी वाढावी, हा तिचा हेतु नाहीं; विश्वबंधुत्वाची कल्पना वाढावी व त्याप्रमाणें मनुष्यानें वागावें, एवढाच तिचा हेतु आहे.

तेव्हां अखिल मानवांच्या हिताच्या दृष्टीनें, तसेंच हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें सोसायटीचें महत्व किती आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईल. अशा हेतूनें काम करणाऱ्या सोसायटीनें कोणत्याही धर्माचा द्वेष करणें शक्य नाहीं. त्यांतून या धर्मक्षेत्राचे ठिकाणीं, धर्मांमध्यें अत्यंत वडील जो हिंदुधर्म त्याचे घरीं, सर्व धर्मीयांस जमवून, त्यांच्यांतील विरोध नष्ट करून, सर्वत्रांस शांतता व परस्परस्नेह यांचें अनुपम सुख देण्याचा तिचा हेतु आहे. हिंदुधर्म सर्वांत वयानें वडील असून अधिकारानेंही वडील आहे. ब्रह्मविद्येचें ज्ञान त्या धर्मांतील ग्रंथांत जितकें विस्तृत आहे तितकें दुसरे कोणत्याही ग्रंथांत नाहीं, असें या सोसायटींतील पुढारी कंठरवानें प्रथमपासून सांगत आहेत. त्या धर्मांत जन्म घेतलेल्या, अतएव त्या धर्माचा अभ्यास करण्यास ज्यांस जास्त अनुकूलता आहे व त्या धर्माचें रहस्य ज्यांस सुलभ आहे, त्या आम्हां हिंदूंस त्यांचें अत्यंत कळकळीचें सांगणें आहे कीं, बाबांनो ! आपल्या धर्माचा अभ्यास करा, त्यांतील ब्रह्मविद्या संपादन करा, व आपल्या लहानग्या भावंडांस ती देण्यास आपणांस पात्र करून घ्या; हें काम परकीयांस फार कठीण पडतें व त्यांचे श्रम वांया जातात. तुम्हीं करीतच नाहीं तेव्हां परकी थोडाबहुत यत्न करीत आहेत तो पाहून जागे व्हा. दयाघन महात्म्यांचे रुपेनें सोसायटी स्थापन होऊन सर्व मानवजातीस आध्यात्मिकदृष्ट्या उन्नतीस नेण्याचा प्रयत्न होत आहे त्यास मदत करा हें सांगणें म्हणजे हिंदुधर्माचा छल, कीं द्वेष, कीं ओढाताण ? अर्थात् हीं तर नाहींतच, पण उलट, असें सांगणें हें हिंदुधर्मास उत्तेजक नव्हे काय ?

थिऑसफी म्हणजे काय, प्रस्तुतकालीं थिऑसफिकल सोसायटीच्या स्थापनेचें प्रयोजन काय होतें व त्यास धार्मिक व इतर कारणें कशीं घडत गेलीं, इत्यादि गोष्टींबद्दलचें प्रथमतः विवेचन केलें. नंतर ह्या

सोसायटीवरील मुख्य मुख्य आक्षेप घेऊन त्यांचें निरसन करण्याचा प्रयत्न केला. पुढें आक्षेपांचें पटल गेल्यावर या सोसायटीचे ( सत्यान्वेषण आणि सत्यप्रतिपादन हें या सोसायटीचें आदिकर्तव्य आहे, ) उद्देश सांगण्यांत आले. पुढें आपल्या हिंदुस्थानास या सोसायटीपासून काय उपयोग आहे, याचा विचार करतांना, थिऑसफीच्या दृष्टीनें हिंदुस्थान-च्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचें अवलोकन करून येथील प्रचलित धर्मांवर या सोसायटीचा काय परिणाम होईल, याचा उहापोह केला. आतां शेवटीं बहुश्रुत बंधुभगिनींस आमची इतकीच नम्र विनंति आहे कीं, त्यांनीं अशा या अत्यंत उपयुक्त व साह्यकारी संस्थेकडे व तिचे मार्फत प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाकडे कृपादृष्टीनें पहावें; म्हणजे तीवर कोणीं शंका आक्षेप घेऊं नयेत असें आमचें म्हणणें नाहीं. ते जरूर घ्यावेत. मात्र माहिती योग्य ग्रंथांतून व अधिकारी मनुष्यांकडून मिळवून नंतर अवश्य घ्यावेत. आक्षेप घेतले पाहिजेत म्हणून, केवळ पोकळ वाद माजविण्यासाठीं, ते घेऊं नयेत; व बहुश्रुत आक्षेपकांचे योग्य आक्षेप हे अपरिहार्य व अवश्यक आहेत, तसे ते येणें स्वाभाविकच आहे. अशा रीतीनें घेतलेले आक्षेप हे कोणत्याही संस्थेस साहाय्यकारक होत. असो. येथपर्यंत केलेल्या विवेचनाचें मनन लहानथोर सर्व बंधुभगिनी करतील, अशी पूर्ण आशा करून हा लेख येथें आटोपतों.

[library stamp]

# मराठी थिऑसफिकल फेडरेशननें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें.

## श्रीसद्गुरुपदिष्ट साधनचतुष्टय

अर्थात् विवेकवैराग्यादि सद्गुण प्रपंचात राहून कसे संपादन करावेत यासंबंधीं सद्गुरूनीं आपल्या शिष्यास केलेला उत्कृष्ट उपदेश.

हें पुस्तक एका मद्रासी चवदा वर्षें वयाच्या मुलानें मूळ इंग्रजींत लिहिलें, त्याचें हें मराठी भाषांतर. या पुस्तकाचीं २५ हून जास्त भाषांत भाषांतरें एका वर्षांत झालीं ! मराठी पहिली आवृत्ति एका वर्षांत खपून गेली. यावरून हें पुस्तक किती उपयुक्त व लोकप्रिय झालें आहे हें उघड दिसून येईल.

| ( आवृत्ति दुसरी. ) | रु. आ. पै. |
|---|---|
| कापडी ( ग्रंथकर्त्याचे सुंदर फोटोसह ) ………… | ० – ८ – ० |
| कागदी पुठ्ठा … … … … … … … | ० – ४ – ० |

## थिऑसफी ( ब्रह्मविद्या ) आणि थिऑसफिकल सोसायटी.

यांसंबंधीं संक्षिप्त माहिती, त्यांवर निघणाऱ्या सामान्य शंका व त्यांचा खुलासा.

थिऑसफी नवीन आहे काय ? सांप्रत ( थिऑसफी ) ब्रह्मविद्येचा प्रसार इंग्रजींतून कां ? सोसायटीचे संस्थापक पाश्चिमात्य कां ? वगैरे शंका व त्यांचा खुलासा धर्मांधर्मांतील वैमनस्यें नाहींशीं होण्यास तसेंच हिंदुस्थानांत धार्मिक उन्नति भक्कम पायावर होण्यास या सोसायटीची मदत कशी होते, तसेंच सोसायटीचा सभासद होण्यानें धर्मांतर मुळींच होत नाहीं; शिवाय सोसायटीचे उद्देश, वगैरे विषय या पुस्तकांत आले आहेत.

| किंमत. | रु. आ. पै. |
|---|---|
| १ प्रतीस … … … | ०—२—० |
| १० प्रतींस … … … | १—०—० |
| १०० प्रतींस … … … | ९—०—० |

सदरहु पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

मुंबई:—डॉ. वि. सो. त्रिलोकेकर, ९६ काळबादेवी रोड.

धुळें:—रा. नारायण गणेश परांजपे.

व सर्व मराठी थिऑसफिकल लॉजिस् व बुकसेलर्स यांजकडे.